# अनुक्रमणिका


पाळकांच्या लेखणीतून -रेव्ह. सॅम्युएल जोगळेकर ......... २

संपादकिय - पा. मधुकर जगताप ......................... ४

नवा संकल्प - सौ. निशा दी. सातपुते ....................... ५

त्याचे नाव येशू ठेव! - अल्बर्ट बॅप्टिस्टा .................. ७

आगमन समय - रेव्ह. ई. एस. रॉबीन ..................... १०

खरा नाताळ - मिस निर्मला काळे ......................... ११

प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत -श्रीमती वासंतिक कदम ... १३

नाताळ येतोय - कविता - रेव्ह. ई. एस. रॉबीन ......... १५

देवाने भेट घेतली- मिसेस मधुबाला एन. जगधने ......... १६

माझ्या स्वप्नातील शंभराव्या
वर्षातील मंदिर - मिसेस ग्लोरी नितीन रावडे ............. १७

हास्यबोध - पा. मधुकर जगताप........................... १८

कॅरल पार्टीचा कार्यक्रम .............................. २०

ख्रिस्तजन्म सप्ताहातील कार्यक्रम ................... २१

दिपशिखा शब्दकोडे - मि. सत्यानंद शरद कसाब ....... २२

पाककृती - कल्पना सनी नायडू ........................... २३

सूचना ............................................... २४


## मंडळीचे नियोजित कार्यक्रम

**रविवारची उपासना :** मराठी - सकाळी ९.१५ वा.

**सण्डेस्कुल - रविवार :** मराठी सकाळी ९.१५ वा.

**पवित्र सहभागिता विधी :** १ ला रविवार.

**पाळकीय समिती सभा :** ३ रा रविवार, उपासना संपल्यानंतर

**महिला मंडळ सभा :** प्रत्येक गुरुवार सायं.६ वा.

**तरुणसंघ सभा :** महिन्याच्या दुसऱ्या रविवारी उपासनेनंतर आणि शनिवारी

**चर्च क्वायर प्रॅक्टिस :** दर शनिवारी सायं.८ वा.

**मेथडिस्ट मेन सभा :** महिन्याच्या चौथ्या रविवारी उपासना संपल्यानंतर

जानेवारी -फेब्रुवारी या अंकातील महत्त्वाचे विषय
**१) नववर्ष  २) आत्मिक जागृती**

**सुचना :** लग्न, साखरपुडा, बाप्तिस्मा, विशेष प्रार्थना इ. सारख्या कौटुंबिक कार्यकमांचे नियोजन करण्यापूर्वी पाळकसाहेबांशी संपर्क साधावा व त्यानंतरच दिवस व तारखा ठरवाव्यात जेणेकरुन दोन किंवा अधिक कार्यक्रम एकाच दिवशी येण्यामधील गोंधळ टाळला जाईल.


व्हर्नन मेमोरियल मेथाडिस्ट मराठी चर्च, मुरबाड रोड, कल्याण या मंडळीचे 'दीपशिखा' हे मासिक, मंडळीचे पाळक रेव्ह, सॅम्युएल जोगळेकर, संपादक : पा. मधुकर जगताप, मो.९८६०४०४८५३ - इव्हरेस्ट प्रिंटर्स, अंबरनाथ येथे छापून, व्हर्नन मेमोरियल मराठी चर्च, मुरबाड रोड, कल्याण येथे प्रसिध्द केले. फोन : ऑफीस : २३१९३१२,
**हे मासिक विनाशुल्क खाजगी वितरणासाठी आहे.**

# पाळकांच्या लेखणीतून

# 'देवाचा जन्म'

- रेव्ह.सॅम्युएल जोगळेकर

परमेश्वराने मानवाला स्वतःच्या प्रतिरुपात बनविले. मनुष्याने परमेश्वराबरोबर सहभागीता करावी व त्याच्या समागमात रहावे ही देवाची इच्छा होती. ह्यामुळे परमेश्वर रोज त्यांच्या बरोबर ऐन बागेत भेटत असे ही बाग देवाचे सौदर्य प्रगट करते. त्या ठिकाणी परमेश्वराने सर्व काही सूंदर व परीपूर्ण निर्माण केले. मनुष्याला कुठल्याही गोष्टीची वाण पडू नये ह्याची परमेश्वराने खबरदारी घेतली होती. ही बाग परमेश्वराच्या पवित्रतेचे चित्र आहे. सर्व जीवन उपयोगी गरजांची पुर्तता देवाने त्या ठिकाणी केली, परंतु त्या सर्व पुरवठ्यांना पवित्र व शुध्द अंतःकरणानेच प्राप्त करता येत होते. ह्यामुळे परमेश्वराने मानवाला त्याचा सर्व स्वभाव व गुण देखील सोपवून दिले ते ह्यासाठी की मनुष्याने परमेश्वराची सुंदरता, स्वभाव, पवित्रता व सर्वकालीकतेमध्ये त्याच्या बरोबर वास्तव्य करावे. मनुष्याने परमेश्वराचे सर्व गुण आत्मसात केले. परंतु परमेश्वराचे ऐक्य व पवित्रता राखून ठेवू शकले नाही. परमेश्वर हा पवित्र आहे कारण त्याचा तो स्वभाव आहे. एवढच केवळ नव्हे तर तो पवित्रतेची रोज निवड करतो. पिता, पूत्र व पवित्र आत्मा हे ऐक्यात व पवित्रतेत प्रारंभापासून आजपर्यंत आहेत व युगाच्या शेवटापर्यंत राहणार असे आम्ही जाणतो. ही पवित्र राहण्याची निवड करण्यास मनुष्य चुकला. परमेश्वराच्या सर्व निर्मिती मध्ये मनुष्य हा विशेष आहे कारण परमेश्वराने त्याला सर्व निर्मितीचा अधिकार सोपवला होता. परंतु हा अधिकार देखील मनुष्य राखून ठेवू शकला नाही.

जेव्हा परमेश्वराने सर्व सृष्टीची जबाबदारी मानवावर सोपवली, तेव्हा परमेश्वराने त्याना कार्य दिले ते विश्वासूपणे करत रहावे ही आशा केली. परमेश्वराने विश्वास राखला व रोज त्यांना भेटून त्यांना आशिर्वादीत केले, परंतु मानवाने परमेश्वराचा विश्वासघात केला. पापाने मनुष्याच्या जीवनात प्रवेश केल्यावर त्याचा दुष्परीणाम त्याच्या संततीवर झाला. पापामुळे मनुष्याच्या दैवी स्वभाव दुषित झाला. पापची निवड केल्यामुळे सर्व पिढ्यांमध्ये पापाचे बिज पसरले व त्यामुळे जन्म व मृत्युच्या चक्राने मनुष्याला ग्रासून टाकिले. परमेश्वराला कधीच शेवट नाही परंतु मनुष्याला त्याने मर्यादा दिली व त्यामध्ये पाप वर विजय मिळवता यावा ही देवाची इच्छा होती.



पापाने मनुष्याचे जीवन अधिकच देवापासून दूर नेले, एवढे की परमेश्वराने निवडलेले राष्ट्र देखील परमेश्वराबरोबर एकचित्त राहू शकले नाही. सर्व जगासाठी एक उदाहरण व्हावे म्हणून परमेश्वराने त्यांच्यावर कृपा केली त्यांना आशिर्वाद दिला व त्यांना पुन्हा त्याच्याबरोबर राहता यावे म्हणून त्यांना दुधामधाच्या देशात वसवले. ह्या नविन ऐन बागेत पुन्हा परमेश्वराने मनुष्याबरोबर वस्ती केली व त्यांना आशिर्वाद दिला. त्यांना पुन्हा एकदा जबाबदारी सोपवून दिली. परमेश्वराने अब्राहमाच्या संततीला जो देश दिला त्यामध्ये चिरकाल रहावे म्हणून त्यांच्या बरोबर करार केला. (उत्पत्ती १७:७-८) परमेश्वराने अब्राहमाच्या कुटुंबाद्वारे सर्व जगाला पुन्हा आशिर्वादीत करता यावे म्हणून त्यांना जगाच्या मधोमध वसवले, जेणेकरुन त्यांना जगाला देवाकडे आणता यावे. (उत्पत्ती १२ : ३)

इस्त्राएलाने परमेश्वराची दैवी इच्छा जाणली नाही व पापात स्वतःचे जीवन व्यतीत केले. परमेश्वराने त्यांना वारंवार शिक्षा देऊनही त्याने परमेश्वराचे मन ओळखले नाही. परमेश्वराचे राज्य इस्त्राएलद्वारे निर्माण व्हावे व सर्व जगात वाढावे

हा परमेश्वराचा प्रयत्न मानवाने पुन्हा धूळीस मिळवला.

परमेश्वराच्या स्वतःच्या प्रती रुपातला मनुष्य व परमेश्वराने स्वतःसाठी निवडलेले राष्ट्र हे दोन्ही देवाच्या इच्छेला पूर्ण करु शकले नाही. मनुष्याचे सर्व प्रयत्न कमी पडत होते, कारण पापाचा पगडा मनुष्यावर सदैव बर्करार होता. पापाच्या ह्या मोहजाळातून मनुष्याची सुटका व्हावी व त्यांनी देवाची इच्छा जाणावी व पूर्ण करावी ह्यासाठी देवाने जगात देहधारण करुन मनुष्याचा जन्म घेतला. परमेश्वराने जे सार्वकालीन जीवन ऐन बागेत मनुष्याला दिले तेच जीवन प्रभू येशू ख्रिस्त घेऊन ह्या जगात आला (१योहान ५ :११-१२) देवाने ख्रिस्तामध्ये जगात येणे केले व सर्व विश्वासणाऱ्यांना त्याचे लेकरे करुन घेतले आहे. ह्यामुळे जी देवाची इच्छा मनुष्याच्या निर्मितीमध्ये होती ती पूर्ण झाली. देवाचे पुत्र व कन्या होता यावे म्हणून ख्रिस्ताचे संयुक्त वारस केले आहे. म्हणून ख्रिस्त जे देवाचे गुण घेऊन जन्म घेतो ते गुण आम्ही आत्मसात करणे गरजेचे आहे. जुन्या करारात इस्त्राएलाचा आदर्श कमी पडला म्हणून ख्रिस्ताने एक विश्वासू, एकयीत्त व कर्यशील जीवनाचे एक उदाहरण मनुष्याला शिकवले आहे. आज्ञा मोडणाऱ्या जगाला आज्ञाधारकपुत्र मिळाला, अविश्वासू जगाला विश्वासू देव मिळाला, पापी जगाला पवित्र व शुध्द जीवनाचा आदर्श मिळाला एवेन बागेत जसा देव मानवाबरोबर  चालला व राहिला तसाच तो आज आम्हामध्ये वस्ती करतो. तो आमचा देव झाला व आम्ही त्याचे लोक झालो. (२ करींथ ६:१६) केवळ देवाने देहधारण केल्यामुळे आज आम्ही त्याच्या संबंधामध्ये पुन्हा एकत्र होऊ शकलो आहोत. मनुष्याचा जन्म जरी पिढ्यांपिढ्या पापात होत आहे, तरी आज ख्रिस्ताच्या जन्मामुळे आम्हाला जीवनाची प्राप्ती झाली आहे.

# महिला मंडळ अहवाल (W.S.C.S Sunday)

१६ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या रविवारची उपासना संचलन करुन, महिला मंडळाने भक्ती मंदिरात W.S.C.S Sunday साजरा केला. समारंभाचा वृत्तांत आम्ही सहर्ष सादर करीत आहोत.

महिला मंडळाच्या प्रत्येक पदाधिकारी सदस्य महिलांनी या कार्यक्रमांत मोठ्या हिरीरीने उत्साहाने सहभाग घेतला होता. अवघे महिला  मंडळ उत्साहपूर्ण हर्षान भरुन  गेले होते.

भक्तीचा आरंभ अर्थात प्रार्थनेने झाला. मंडळाच्या अध्यक्षा मिसेस संगीता देठे यांनी उपासना प्रारंभीची प्रार्थना केली. तद्नंतर मिसेस भोसले यांनी आढीपाळीच्या शास्त्रवाचनाचे नेतृत्व केले, मिसेस संध्या जोसेफ यांनी लुककृत  शुभवर्तमान याच्या २५ व्या अध्यायांतील २२ ते २६ या पवित्र वचनांचे पठण केले. मध्यस्थीची प्रार्थना मिसेस सोनाली जोगळेकर यांनी केली. मंडळाच्या सचिव मिस् निर्मला काळे यांनी महिला मंडळाच्या कार्याचा अहवाल दिला. नागपूर मराठी मेथडिस्ट चर्चच्या Lay Preacher च्या Chair person मिसेस नीता मसके उपासना कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या. खेरीज उपासनेतील संदेश वाहकाची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांनी आनंदाने स्वीकारली होती. मिसेस ग्लोरी रावडे यांनी त्यांचा परिचय करुन दिला. महिला मंडळांच्या अध्यक्षा मिसेस संगीता देठे यांनी पुष्पगुच्छ देऊन मिसेस नीता मसके यांचे स्वागत केले. पाळकीणबाई मिसेस सोनाली जोगळेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत अध्यक्षबाईंनी केले, रेव्ह रॉबीन यांचा सन्मान मिस. निर्मला काळे यांनी पुष्पगुच्छ प्रदान करुन केले.

प्रवचनकार मिसेस नीता मसके यांचा संदेश लूक २५ : २२ ते २६ या शास्त्रवचनांवर आधारीत होता. स्वतःच्या दांपत्य जीवनांतील पतीच्या  अकस्मात निधनाची घटना आणि त्यामुळे त्यांच्या मनांतील खळबळ याविषयीची साक्ष त्यांनी आपल्या संदेशात दिली, ती उपासक श्रोत्यांचे मन हेलावणारी अशी होती. राई एवढा विश्वास जरी आपण मनस्वी प्रामाणिकपणे बाळगला तर आपल्या जीवनात कसे परिवर्तन व इष्ट बदल घडतात यांचे मनोवेधक प्रभावी विश्लेषण त्यांनी केले. दानर्पण प्रसंगीचे विशेष सुरेल गीत महिला मंडळाने सादर केले. भक्ती समाप्तीनंतरचा आशिर्वाद मंडळीच्या आचार्यांनी दिला व उपासना समाप्ती झाली. ख्रिस्तश्रध्दा वृध्दी आणि अध्यात्मिक, उन्नती साधणारा संदेश मनाला लाभला तर आश्चर्य ते काय ?

**मिसेस संगीता देठ**

- अध्यक्ष, महिला मंडळ


# संपादकीय

शतकपूर्तीच्या या महिन्यांचा दिपशिखा अंक प्रसिध्द करण्यात आम्हास अतिशय आनंद होत आहे. व्हर्नन मेमोरियल मेथडिस्ट मराठी चर्च हे नाव प्राप्त झालेली आमची ही मंडळी मागील शंभर वर्ष परमेश्वराने कशी सांभाळली असेल याची कल्पनाच करवत नाही.

देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेली वेगवेगळी संस्कृती, वेगवेगळे आचार, विचार, कल्याण, अपेक्षा तसेच मंडळीच्या गरजा, मंडळीच्या समस्या, मंडळीसमोर असलेली आव्हाने हे सर्व पुर्ण करीत मंडळीचे आत्मिक पालन पोषण करीत सैतानाच्या सर्व हल्ले व कुयुक्त्यांवर मात करण्यासाठी विश्वासात दृढ आणि बलवान करीत, परमेश्वर जोर उत्तम मेंढपाळ त्याने आपल्या हाताला धरुन येयपर्यंत चालविले त्या परमेश्वराला लाख लाख धन्यवाद!

येत्या महिन्यात ख्रिस्त जन्माची /नाताळाची तयारी करीत असताना येशू जन्मासंबंधीच्या गोष्टी ध्यानात घ्याव्यात असे वाटते.

येशूच्या जन्मासाठी दविदाच्या नगरात बेथलहेमान जागा नव्हती तेव्हा एका सामान्य गोठ्याच्या मालकाने आपला गोठा उपलब्ध करुन दिला. रानात गरीब मेंढपाळ जे रात्री आपले मेंढराचे कळप राखीत होते. त्यांना प्राप्त झालेली शुभवार्ता की, 'आम्हासाठी तारणारा जन्मला आहे' ह्या तारणाऱ्याचा शोध करुन मेंढपाळांनी त्या बालकास नमन करुन आपली दाने अर्पण केली. मागी लोकांनी जे अतिशय ज्ञानी होते, आकाशातील तो तेजस्वी तारा पाहून ज्या ताऱ्याचा अर्थ महान राजाचा जन्म असा आहे. त्या राजाला म्हणजे येशू बाळाला, त्याचा माग काढीत येरुशेलमात पोहचले व गव्हाणीत जन्मलेल्या त्या राजांच्या राजाला भेटून नमन करुन. आपल्या मौल्यवान भेटी त्यास अर्पण करुन धन्य झाले.



आपला तारणारा जन्मला आहे तो ख्रिस्त येशू आहे याचे स्पष्ट शिक्षण आम्हास प्राप्त झालेले असताना, देवाने आम्हा पातक्यांची पापापासून सुटका करण्यासाठी आपल्या एकूलत्या एका पुत्राला राखून न ठेवता आम्हाकरीता दिले. त्या देवाला आम्ही काय देतो ?

मागील शंभर वर्षे आमच्या मंडळीला, सभासदांना सांभाळले, आमच्या पिढ्या आशिर्वादीत केल्या आमच्या लेकराबाळांना सुमार्गाने चालविले, समृध्द जीवन, सुखी जीवन आम्हास बहाल केले. आमची वृध्दी घडविली. या मंडळीत असतानाच आम्ही आमची कुटुंबे उत्कर्ष पावलेली आम्ही पाहिली. त्या परमेश्वराला आम्ही काय दिले ? त्या जगाच्या तारणाऱ्याला आम्ही काय दिले ? देव कसे आणि आणखी एक ख्रिस्त जन्म सोहळा साजरा करण्यापूर्वी आम्ही देखील त्या येशूला काहीतरी देण्यासाठी देव आम्हांस सहाय्य करो!

मंडळीचा शतकपूर्ती महोत्सव आणि ख्रिस्त जन्मोत्सव आणि येणारे नवीन वर्ष आपणास सुखसमृध्दीचे भरभराटीचे आणि दिव्य आशिर्वादाचे जावो!!

**- पा. मधुकर जगताप**
अध्यक्ष, लिटरेचर कमिटी

# नवा संकल्प

नेहमीप्रमाणे प्लॅटफॉर्मवर उतरताच धावपळीच्या गर्दीत ती ही सामील झाली. पण तेवढ्या गडबडीत तिचे लक्ष स्टेशन बाहेरील कोपऱ्यावर गेले. आजही तो कोपरा रिकामाच होता. चालता -चालता ती आपल्या मैत्रीणीला निलीमाला म्हणाली, ''अगं! आज पण शारदा आली नाही वाटतं? अपर्णाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत निलीमा उत्तरली, ''तुला का गं तिची इतकी काळजी? आपल्याला कमी ताप आहे का? कामावर इअर एंडींगची किती कामं आहेत? पण अपर्णाच्या मनाला चुटपुट लागली होती. नेहमी हसतमुखाने कोपऱ्यात गजरे, हार, फुले विकणारी प्रसन्न चेहऱ्याची शारदा तिला चार दिवस तेथे दिसली नाही. ऑफिस मध्येही तिचे कामात मन लागेना. तिने या सर्वांच्या मुळाशी जाण्याचे ठरविले. उद्या तिला सुट्टी होती. तिने ऑफीस मधून परत येताना शारदाची मैत्रीण मालती, तिथेच फुटपाथवर बसून खाऊ विक्रीचा धंदा करायची. तिच्याकडे जाऊन अपर्णाने शारदाचा पत्ता विचारला आणि मनाशी निश्चय करुन ती घरी गेली. तिची अस्वस्थता तिचा पती रविच्या लक्षात आली. ''काय झाले?'' हे ही त्याने विचारले. पण तिने वेळ मारुन नेली. कारण खरे कारण त्याला कळाले असते तर त्याने तिला चिडीवले असते. दुसऱ्याच्या दुःखाने ती व्यथीत होते हा तिचा स्वभाव त्याला ठाऊक होता. म्हणून तो तिला रागावत असे. ''साऱ्या जगाची तू कशाला काळजी करतेस? तू काय जगाचा मक्ता घेतलास का?'' असे म्हणून तो तिला हिणवत असे. म्हणून तिने गप्प राहणे पसंद केले. पण आपण या जगाचा एक भाग आहोत व ख्रिस्ताने शिकविल्या प्रमाणे दीन-दुबळ्यांची सेवा करणे. गरजवंतांना देणे हे प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीचे कर्तव्य आहे असे अपर्णा मानत असे म्हणूनच ती कोणाचेही दुःख पाहून व्यथित होत असे. दया करणे हीच आपली सेवा आहे हे मानून ती दया करण्यात पुढे असे. सकाळीच उठून तिने तयारी केली व ''ख्रिसमस डेकोरेशनचे सामान आणायचे, मला संध्याकाळी उशीर होईल'' असे रविला सांगू ती ऑफीसला गेली.



अपर्णा एका प्रायव्हेट कंपनीत काम करणारी नवविवाहीत ख्रिस्ती तरुणी. रवि तिचा पती राजा राणीचा त्यांचा संसार. दोघेही कमावणारे त्यामुळे समृध्द जीवन. परंतु या समृध्दीतून ती नेहमी इतरांना दानधर्म करण्यास पुढे असते, याचा काही संधीसाधू लोक फायदा घेत असत त्यामुळे रविला राग येई. तो तिला वारंवार समजावण्याचा प्रयत्न करत असे. पण तिच्या वृत्तीत व स्वभावात बदल पडत नव्हता. आताही तिने ऑफीसमधून हाफ डे सुट्टी घेतली व ती थेट शारदाचे घर शोधायला वांद्रेस्टेशन नजीकच्या झोपडपट्टीत शिरली विचारपूस करत ती भर उन्हात गल्ली बोळातून चिंचोळ्या रस्त्यातून, नाल्यातून, घाणीतून वाट काढत चालली होती. दाटीवाटीने उभारलेल्या झोपड्या. समोर उघडी गटारे, बाजूला दुर्गंधी पसरवणारा नाला, उघडी वागडी बागडणारी लहान मुले तिला हे बघुन शहारेच आले अंगावर. एकदा वाटलं मागे फिरावे. पण ती नेटाने पुढे जात राहिली. अखेर शारदाच्या झोपडी समोर येऊन उभी राहिली. अंधाऱ्या झोपडीत पाऊल टाकताना ती घामाने निथळत होती. शारदा पाच वर्षाच्या छोट्या मुलाला कुशीत घेऊन फाटक्या सतरंजीवर पडली होती. अपर्णाला बघताच ती धडपडून उठली तिने कंदील पेटवला. चूल पेटवून चहा ठेवला. ''चार दिवस तू का आली नाहीत?'' हे विचारले असता कळले की तिचा मुलगा निकी चार दिवस तापला होता. जवळच्या डॉक्टरांकडून उपचार केले पण अद्याप ताप उतरत नाही. उतरला की पुन्हा चढतो. रक्त तपासणी आदी उपचारांसाठी तिच्याकडे पैसे नाहीत. चार दिवस धंदाही नाही. नवऱ्याचा असून काहीच उपयोग

नाही. त्याला कामच नाही. काम लागले तरी तो कुठे टिकत नाही. आयतं बायकोच्या जीवावर बसून खायलाच त्याला आवडते. वर दारु प्यायला तिच्याकडून जबरदस्तीने मारुनमुटकून पैसे काढतो. रोजच्या जाचाला ती कंटाळली होती. आपले दुःख, जाच तिने कधी कोणाला सांगितला नाही. मुकाट्याने ती सर्व सहन करत होती छोट्या निकिकडे बघून.

छोटा निकी तिचे सर्वस्व होता. आपल्या दारिद्र्याची झळ त्याला पोहचणार नाही याची काळजी घेऊन ती रात्रंदिवस कष्ट करत होती. शक्यतो आपल्या बरोबरच ठेवत होती. त्याच्यावर वाईट संस्कार होवू नये म्हणून झोपडपट्टीतील मुलांपासून त्याला दूर ठेवण्याचा प्रयत्न करत होती. त्याला खुप शिकवून मोठे करायचे हे एकच स्वप्न तिने उराशी बाळगले होते. पण त्याच्या आजारपणामुळे तिची गाठीशी असलेली पुंजी संपली पण त्याचा ताप हटेना, तिला काहीच सुधरेना. त्याला अशा परिस्थितीत ठेवून ती कामासाठी बाहेर जाऊ शकत नाही. अशा बिकट परिस्थितीत अपर्णा तिच्याकडे आली. ओलसर जमिनीमुळे ताप हटणे शक्य नव्हते. दुषित वातावरण आजाराला पोषक होते. म्हणून अपर्णाने त्याला जवळच्या एका खाजगी हॉस्पीटलमध्ये दाखल केले. त्याला सर्व औषध आणून दिले. शारदाच्या हातात थोडे पैसे देऊन ती बाहेर पडली. कृतज्ञ अंतःकरणाने व शांतीने ती घरासाठी लागणारे सामान घेऊन ती घरी परतली. आपण कोणाच्या तरी उपयोगी पडलो वेळेला या समाधनात ती शांत झोपी गेली. निकी बरा झाला, घरी आला, शारदा परत गजरे विकू लागली. ख्रिसमसच्या गडबडीत तिला शारदाशी शांतपणे संवाद साधता आला नाही. बँकबुक चेक करताना रविला १० हजार रुपयांचा हिशोब लागत नव्हता. अपर्णाने स्वतःसाठी ही काही सणासुदीला घेतले नव्हते. शेवटी रविने तिला विचारले तेव्हा तिने सरळ हिशोब दिला. ''माझ्या खरेदीसाठी तुम्ही जे पैसे देणार होता ते मी निकीसाठी खर्च केले. मला काही नको'' तिच्या या उत्तराने रवि निरुत्तर झाला. आपल्याला अशी बायको मिळाली याचा मनातून त्याला आनंदच झाला. जी शॉपिंगसाठी पैसे न उडवता दुसऱ्याचा विचार करते.

नव्या वर्षात पदार्पण करताना अपर्णाने त्याच्याकडे एक भेट मागितली. ''शारदा व निकिला ती घरी घेऊन आली. शारदा घरकाम करुन तिचे घर सांभाळू लागली. निकीला चांगल्या शाळेत घातले. नवे वातावरण नवे घर त्याला खुप आवडले. शारदा मनापासून घरच बघत होती. निकिचाही रविला लळा लागला. एक बालजीवनाला आधार व आकार मिळाला. प्रथम रविला ही कल्पना पटली नव्हती. पण आज खरच त्यामुळे घराला घरपण लाभले. अपर्णाची धावपळ कमी झाली. तिला स्वास्थ लाभले. शारदाला आसरा व आधार आणि निकिला उज्वल भविष्य, सण समारंभ सर्वच साजरे करतात. नवे वर्ष सर्वांनाच लाभते. नवे संकल्पही केले जातात. पण ते सर्व असतात स्वतःसाठी, आपल्या आप्तस्वकीयांसाठी ख्रिस्त जन्मास आला, जगला, वधस्तंभावर अर्पिला गेला. इतरांसाठी अखिल जगतासाठी. आम्ही पण जगावे इतरांसाठी, ''जगाला प्रेम अर्पावे'' ख्रिस्त कृतीतून ''जन सेवा हिच ईश्वर सेवा''.


**- सौ. निशा दी. सातपुते**
**९३२३१२१३८२**

## शब्दकोड्यांची उत्तरे पाठविणाऱ्यांची नावे

१) श्रीमती मधुबाला एन. जगधने
२) मिस. निर्मला काळे
३) मिसेस वंदना प्र. तोरणे
४) मिसेस. रुपाली एन.खंडागळे
५) स्वप्नील चलम
६) सिस्टर सुषमा वसंत तेलगोटे - भुसावळ
७) मि. प्रभाकर छत्रे

# त्याचे नांव येशू ठेव!

आमचा कार ड्रायव्हर रॉकीने अचानक गाडीचा ब्रेक करकचून दाबला. कर्रऽऽकर्रऽऽकिर्रऽऽकिर्रऽऽ अशा कर्णकर्कश आवाजाने जीवाचा थरकाप उडाला. रात्रीच्या निरव शांततेत तो आवाज भयाण वाटला. कार थांबविण्याच्या ईराद्याने हातवारे करीत  एक तरुण वाट अडवून उभा ठाकलेला गाडीच्या फ्लडलाईट मध्ये दिसला. रस्त्याच्या कडेलाच अंगावर चादर लपेटून एक तरुणीही उभी असलेली लाईटमध्ये दिसली. मध्यरात्री अकराचासुमार. २४ डिसेंबरची मध्यरात्र. ख्रिस्तजन्म पूर्व संध्येचा मुहूर्त. एन.आर.सी.कॉलनी, मोहोने येथून कल्याणच्या व्हर्नन चर्चमध्ये 'वॉचनाईट उपासनेला आम्ही निघालो होतो. कारमध्ये आम्ही मोजके पांच जण. मी, माझी पत्नी,पुत्र, कन्या व आमचा कार सारथी रॉकी. अंदाजे १९७८ सालची ही घटना असावी. मोहोने  येथून कल्याणला जाण्यासाठी त्याकाळी लोकल ट्रेन, बस, रिक्शा यांची रात्रीच्या समयी उपलब्धता नव्हती. एवढेच नव्हे तर मोबाईल, संगणक यांचीही तोंडओळख झालेली नव्हती. कंपनीच्या आमच्या मॅनेजर साहेबांना पटवून मी कार व ड्रायव्हरची व्यवस्था मोठ्या मिनतवारीने केली होती आणि समोर अचानक उभे ठाकले हे विघ्न! ''साहेब एक्सेलेटर दाबून कार वेगाने पुढे दामटवू, रस्ता अडविणारा हा भितीने आपोआप बाजूला होईल. रात्रीच्या प्रहरी हा रस्ता फारच डेंजरस असतो. लूटमार, चोरीमारीचे प्रकार येथे नेहमीच घडतात.'' रॉकी ड्रायव्हरने आपला अनुभव सांगितल. तत्क्षणी माझी पत्नी त्वरेने आणि वेगाने म्हणाली... ''नाही... नाही... ब्रदर रॉकी, गाडी येथेच थांबव. रस्त्याच्या कडेला उभी असलेली ती तरुण मुलगी बघ. अडलेली गर्भवती दिसते बिचारी. तीला मदत करायलाच हवी. कल्पना कर की तिच्या जागी आपली मुलगी असती तर? अडलेल्या गर्भार गरजवंत पोरीला सोडून बेजबाबदारपणे निघून जाणे ख्रिश्चन स्पिरीटला शोभणारे नाही. थांबा, ''मी तीला विचारुन येते हं''  एवढ्या निबिड अंधकारात कारच्या



लाईटमध्ये माझ्या पत्नीने  त्या मुलीचे किती बारकाईने निरीक्षण केले होते. ? मला कौतुक वाटले तीचे! माझी पत्नी तरातरा चालत निर्भिडपणे त्या तरुणीकडे गेली. रस्ता अडवून उभा असलेला तरुण तिचा पती होता, तो ही त्यांच्याकडे गेला. माझ्या पत्नीने त्यांची विचारपूस केली असावी. त्यांना सोबत घेऊन ती कारजवळ आली आणि लगबगीने म्हणाली. ''यांना लगेच गाडीत बसवा, आणि गाडी त्वरेने तडक कल्याणच्या म्युन्सिपल प्रसुतिकागृहाकडे घेऊन चला आणि हो, ब्रदर रॉकी, खड्ड्याखुड्ड्यांतून गाडी जरा जपून चालव... पोरीला वेदना होता कामा नये. पोरीचा प्रसूती समय येऊन ठेपलाय. प्रसूती वेदनांनी तळमळतेय बिचारी! नंतर माझ्याकडे रोखून पहात माझी पत्नी म्हणाली ''अहो, आज ख्रिस्त जन्माची शुभ-रजनी, अशा मंगलसमयी आपण येशू ख्रिस्ताने घालून दिलेला ''उत्तम शोमरोन्याचा कित्ता गिरवायला नको कां? आपले ते ख्रिस्ती कर्तव्य नव्हे काय?'' आपल्या गाडीवरचे नियंत्रण सांभाळीत, मधेच रॉकी म्हणाला, 'सिस्टर, तुम्ही त्या 'गुड सॅमेरिटन विषयी बोलता ना? चला तर मग आज 'ख्रिसमस ईव्हला' गुड सॅमेरीटन बनू या. ओके?'' रॉकीच्या कारची चक्रे प्रसूतीगृहाच्या दिशेने चालली होती. अन त्याच वेळी माझी विचारचक्रे उत्तम शोमरोन्याच्या रोखाने वेग घेत होती.

येशू ख्रिस्ताची परीक्षा पहाण्याकरीता एक धर्मकर्मठ भोंदू शास्त्र्याने येशूला प्रश्न केला, ''माझा शेजारी कोणास म्हणावे ?'' येशूने त्याला एक बोधकथा कथन केली (लुक १० : २५- ३७) यरुशलेमाहून यरीहोस जात असतां, एक प्रवासी लुटारुंच्या तावडीत सापडला. त्याच्या चिजवस्तूंची लूट करुन त्याला अर्धमेला होईपर्यंत मारहाण केली आणि लूटारु पसार झाले. एक धर्मनेता याजक त्या वाटेने 'स..ह..ज' चालला होता. सहज म्हणजे, अगदी ठराविक वेळी त्याचे काही महत्त्वाचे काम व्हावे अशी परिस्थिती नव्हती. रमतगमत चालले होते. याजक महाशय अर्धमेला घायाळ असा प्रवासी त्याला रस्त्यात निपचित पडलेला दिसला. परंतु त्या तथाकथित धार्मिक पुढाऱ्याला त्याचा कळवळा आला नाही. आपली वाटवाकडी कडून तो स्वार्थी याजक 'दुसऱ्या बाजुने' चालता झाला. एक लेवीही त्या वाटेने चालला होता. जखमी घायाळ निपचित पडलेल्या त्या प्रवाशाला लेवीनेही पाहिले. 'विनाकारण नको ही ब्याध' असा सोईस्कर स्वार्थी विचार करुन तो ही त्याला टाळून निघून गेला. एक शोमरोनी त्या वाटेने चालला होता. जखमी, घायाळ, अर्धमेला पडलेला तो गरजवंत लाचार ईसम त्याला दिसला. शोमरोन्याचे दयाळू हृदय द्रवले. अतीव कळवळा आला त्याला त्या बिचाऱ्या इसमाचा, केवळ कळवळ्याचा उमाळा घेऊन तो थांबला नाही तर त्याने प्रत्यक्ष कृती करुन त्या गरजवंताची मदत केली. वास्तविक हा शामरोनी महत्त्वाच्या कामासाठी निघाला होता. सवडीचा मोकळा वेळही त्याच्याकडे नव्हता. तरी त्या जखमी ईसमाला त्याने स्वतःकडील औषधंनी प्रथमोपचार दिला. सुरक्षित स्थळी त्या जखमी इसमाला घेऊन जाणे जरुरीचे होते, हे शोमरोन्याने जाणले. परंतु घोडा गाढव असे कोणतेही वाहन त्यावेळी उपलब्ध नव्हते. करुणाकर शोमरोनी त्या प्रसंगी स्वतः हमाल बनला. बेशुध्द ईसमाला आपल्या पाठुंगळीवर लादून लांबचे अंतर कापीत एका सुरक्षित उतारशाळेत त्याला घेऊन गेला. केवढा हा कळवळा ! केवढी ही करुणा ! केवढी ही दया ! गरजवंत जखमी इसमाला त्याने अर्धवट सहाय्य करुन वाऱ्यावर सोडले नाही तर तो बरा होईपर्यंत त्याची तजवीज करण्याची व्यवस्था शोमरोन्याने केली. उतारशाळेतील रक्षकाला त्याने बजावले की हा जखमी बरा होईपर्यंत याची सुश्रूशा कर. जो काही वरकड खर्च होईल तो मी परतल्यावर तुला अदा करीन, शोमरोन्याने अशा प्रकारे गरजवंत जखमी माणसाची पूर्णपणे मदत केली. आपले कर्तव्य अर्धवट टाकून त्याने पळ काढला नाही. म्हणून त्याला 'चांगला शोमरोनी' म्हटले जाते. ''माझा शेजारी कोण ?' असा प्रश्न करणाऱ्या शास्त्री महाशयाला ही बोधकथा एकून शेवटी येशूने त्याला विचारले, ''याजक, लेवी आणि शोमरोनी या तिघांपैकी गरजवंताचा खरा शेजारी कोण ?'' गरजवंतावर दया करणारा शोमरोनी हाच त्याचा सच्चा शेजारी !'' येशूने शास्त्र्याला बजावले, ''तू ही तसेच कर !'' (लूक १० : ३०-३७) ''मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खायदा दिले, तान्हेला होतो तेव्हा पाणी प्यायला दिले, अनोळखी परका होतो तेव्हा तुम्ही मला स्वगृही आश्रय दिला, उघडा होतो तेव्हा पांघरायला वस्त्र दिले. आजारी होतो तेव्हा माझा समाचार घेतलात. बंदीशाळेत होतो तेव्हा तुम्ही भेटायला आलात'' मग नितीमान धार्मिक येशूला विचारतील, ''प्रभूजी, आम्ही हे सर्व आपणासाठी केव्हा केले ?'' प्रभू येशू त्यांस उत्तर देईल, ''माझ्या अति कनिष्ठ सामान्य बंधूमधील एकाला जरी केले, तर ते मलाच केले असे ठरेल'' (मत्तय २५ : ३५-४०)

प्रसूतीगृहाच्या आवारात रॉकी ड्रायव्हरने कार पार्क केली आणि सौम्य आवाजात हॉर्न वाजविला. हॉर्नच्या आवाजाने माझी विचार श्रृंखला भंग पावली. प्रसूतीगृहात सेवा करणाऱ्या काही परिचारीका आमच्या कल्याणच्या व्हर्नन मंडळीच्या सभासद होत्या. परंतु आज त्यांनी ख्रिसमस निमित्त सुट्टी काढली असणार अशी अटकळ बांधली. गाडीच्या हॉर्नचा आवाज ऐकून मेट्रन दयाबाई गायकवाड आमच्या पुढ्यात उभ्या ठाकल्या आणि आम्हांस देव पावल्याचा आनंद झाला. करुणामयी दयाबाई म्हणजे साक्षात

दयासागर! आम्हाला पाहून त्यांना आश्चर्य वाटले. माझ्या पत्नीने त्वरेने त्यांना सर्व वृत्तांत कथन केला. गर्भार मुलीला पाहून दयाबाई घाईने म्हणाल्या ''पोरीच्या प्रसूतीची घटका भरलीय! पहा, तिला प्रसूती वेणाही होत आहेत.'' लगबगीने वेळ न दवडता दोन आयाबाईंच्या मदतीने गर्भवतीला स्ट्रेचवरुन थेट 'लेबर रुममध्ये घेऊन गेल्या. माझी पत्नी व दोन मुलांसह, मी आणि रॉकी लेबर रुमच्या ओसरीवरील बाकावर बसलो. गर्भवती तरुणीचा पती आमच्या शेजारी विमनस्कपणे उभा ठाकला. बिचाऱ्याच्या चेहेऱ्यावर तणाव स्पष्ट दिसत होता. मी माझ्या पत्नीला म्हटले, ''चला, आता आपली जबाबदारी संपली. उपासनेला चर्चमध्ये जाण्यासाठी आपण निघू या. ख्रिस्त जन्माच्या मुहूर्ताला केवळ दहा मिनीटे उरलीत . 'नाही... नाही' म्हणत माझ्या पत्नीने तात्काळ ठामपणे नकार दिला. ''अहो, अशा निर्णायक क्षणी आपली जबाबदारी अर्धवट सोडून पळ काढणे हे आपल्या ख्रिस्तीपणाला शोभनीय ठरणार नाही. 'उत्तम शोमरोन्याने' आपली जबाबदारी कशी पूर्णपणे निभावली हे आपण जाणतो ना? प्रथम बाळंतीणीची सुरक्षित सुटका तरी होऊ द्या. बाळबाळंतीण सुखरुप असा संदेश कळला की आपली ईतिकर्तव्यता संपते. नाताळाच्या उपासनेला उद्याही जाता येईल'' माझ्या पत्नीचे वाक्य पुर्ण होण्याच्या आंतच, लेबर रुममधून टयाँहाऽऽट्याँहाऽऽऽ रडण्याचा नाद घुमला. नवजात बालकाने आपल्या जन्माची ग्वाही दिली, आपल्या आगमनाची नांदी बाळाने जगजाहीर केली आणि... आणि... फटक्यांच्या कडकडाटाने आणि रोषनाईच्या आतिषबाजीने आसमंत व्यापून गेला. कारण...कारण... येशूबाळाचा जन्मही त्याच मुहूर्तावर झाला होता. किती रम्य योगायोग? सुटकेचा सुस्कारा आम्ही सोडला. शेजारी उभा असलेल्या नवजात बालकाच्या पित्याने माझ्या व पत्नीच्या पायावर आपला माथा टेकला. त्याच्या तप्त अश्रूंची फुले आमच्या चरणांवर ओघळली. चेहेऱ्यावर विजयी हास्य धारण करीत करुणामयी दयाबाई आमच्यापाशी आल्या. ''परमेश्वराच्या कृपेने बाळ-बाळंतीण पूर्ण सुरक्षित आहेत. पोरीने गोजिरवाण्या गोंडस मुलाला जन्म दिलाय. पहिलटकरीन असूनही प्रसुती नॉर्मल झाली.'' एका दमात दयाबाईंनी सुवार्ता कथन केली. ''चला, बाळाला पहायला येताय ना?'' दयाबाईंनी विचारले. बाळाला पाहण्यासाठी आम्ही वॉर्डमध्ये प्रवेश केला. प्रसूती पूर्वीच्या वेणा आणि प्रसूती प्रसंगाचे श्रमवेदना यांनी बिचारी बाळाची माता थकली, दमली होती. तरी तिच्या चेहेऱ्यावर क्षीण हास्य विलसत होते. आम्हाला पाहून बाळाच्या मातेने कृतज्ञतापूर्वक आपले हाथ जोडले, डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. आमचेही डोळे पाणावले. रांगडा रॉकीही त्याला अपवाद नव्हता. असा असतो माणूसकीचा गहिवर! गोंडस बालकाचे माझ्या पत्नीने चुबन घेतले. बाळाच्या मातेने खुणावून माझ्या पत्नीला जवळ बोलाविले आणि तिच्या कानात काही कुजबूजली. माझ्या पत्नीनेही तिच्या कानात काही कुजबूज केली.

आम्ही चर्चमध्ये पोहोचलो तेव्हा अर्थात उपासना आटोपली होती. परस्परांस हस्तांदोलन करीत भक्तगण एकमेकांस नाताळच्या शुभेच्छांचे आदानप्रदान करीत होते. आम्ही मंदिरात प्रवेश केला आणि वेदीपाशी गुडघे टेकून देवाचे आभार मानले आणि नंतर माझी पत्नी मुलं रॉकी आणि मी आम्ही परस्परांस ख्रिस्तजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. रॉकीने आम्हांस घरी सोडले. आमच्या घरासमोर कार पार्क करुन तो बायबाय करुन आपल्या घरी जाण्यास निघाला. पण परत फिरुन आमच्याकडे आला आणि माझ्या पत्नीला विचारले ''सिस्टर, सुतिकागृहात तुम्ही आणि बाळाची आई परस्परांच्या कानांत काय कुजबूजल्या? माझी पत्नी म्हणाली ''बाळाच्या आईने मला विचारले, मावशी बाळाचे नांव काय ठेवू? तेव्हा मला गब्रीएल देवदुताने मरीयेला सांगितलेला दैवी आदेश आठवला आणि मी बाळाच्या आईला म्हटले... त्याचे नांव येशू ठेव!

**धन्यवाद!**

**- अल्बर्ट बॅप्टिस्टा**
मो. ९३२४४९४१०५

# आगमन समय

आगमन समयाचा आरंभ रविवारी होतो. देवाने खिस्तांविषयी दिलेले अभिवचन पूर्ण होण्याची वाट पाहताना देवही आमची वाट पाहात आहे. आमचे आभाराचे शब्द, आमची स्तुती, ऐकण्यास तो आतूर आहे. आम्ही कृतज्ञ व विश्वासू लोक व्हावे हीच त्याची इच्छा आहे. या उपकार स्मरणाच्या दिवशी आपण उंच स्वराने त्याची स्तुती करुया आणि कृतज्ञतेने आपली अंतःकरणे त्याला सादर करु.

आगमन समय सुरु झाला की लवकरच आगमन होते. आगमन फक्त ख्रिस्तबाळाचेच नाही. हे आगमन मेघामधून परत येणाऱ्या मनुष्याच्या पुत्राचेही आहे. तो देवराज्याची परिपूर्णता, न्याय, उध्दार हे सर्व घेऊन येणार. आगमन समयाचा आरंभ होत असताना आपण अधिक वेगाने कृतीने प्रतिक्षा करावी आणि प्रतीक्षा करताना आपण देवाचे राज्य मिळवण्यास झटावे आणि देवाने निर्माण केलेल्या जिवांची काळजी घ्यावी आणि ख्रिस्ताचा स्वीकार करण्यासाठी स्वतःला व आपल्या जगाला तयार करुया.

आगमन समय विशेष महत्त्वाचा आहे. देवाची महान कार्ये आम्हाला माहित आहेत. आम्ही आनंदाने प्रतिक्षा करतो. जगामध्ये देवाचे तारणदायी सान्निध्य सतत राहील अशी आशा धरतो. देव आमची शक्ती व सामर्थ्य आहे. तो या जगात पुन्हा येणार आहे. देव पुत्राच्या आगमनाची वाट पाहताना आपण देवाच्या नावाचा जयघोष करु आणि मोठ्या आनंदाने देवाची स्तुती करु. कारण यशया संदेष्टा सांगतो, कारण देव आमचे तारणाचे, आरोग्य देण्याचे कार्य जगामध्ये सतत करीत आहे आणि आम्ही त्याचीच वाट पाहत आहोत. आमचा उध्दारक, तारणकर्ता ख्रिस्त जन्मण्याची प्रतिक्षा करतो. या आगमन समयात पुन्हा एकदा देवाच्या आगमनाची वाट पाहत असताना आम्हाला भिण्याचे कारण नाही. समर्थ देव खात्रीने आम्हाबरोबर आहे.

या आगमन समयात आम्ही आशेने व अपेक्षेने प्रतिक्षा करीत आहोत. अशावेळी सफन्याच्या पुस्तकातील अध्याय ३:१४-२० वचने देवाने आम्हाला न्यायापासून घेऊन कृपेमध्ये नेले आहे. याचे पुन्हा स्मरण देतो. ख्रिस्तबाळ येण्याची वाट पाहताना आनंदाने अंतःकरण फुलून येते. दोषापराधी ठरण्याची धास्ती वाटत नाही. यातून निराशा नव्हे तर उध्दार मिळतो. आगमन समयात आमची मने अनेक कामात गुंतलेली असतात. बक्षिसे खरेदी करायची असतात, लोकांकडे समारंभासाठी जायचे असते. आप्तांच्या भेटी घेणे याशिवाय इतर अनेक जबाबदाऱ्या सांभाळायच्या असतात. या सर्व कामात अगदी व्यस्त असतो.



प्रभूच्या या आगमनासाठी स्वतःला आणि इतरांना तयार करताना बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या मनात पश्चातापाचा विचार आहे आणि आपणही आपल्या मनात पश्चातापाचा विचार ठेवावा असे तो सांगतो. देव आम्हालाही पश्चाताप करण्याची प्रत्येक संधी देतो. या आगमन समयात पश्चाताप करण्यासाठी आपल्या अंतःकरणामध्ये जागा देऊ आणि आनंदाने धीर धरुन धैर्याने ख्रिस्ताच्या येण्याची वाट पाहू. देव रक्त मासांचा देह धारण करुन जगात का आला ते आपल्या लक्षात आले असेल तर आगमन समय आणि मिशन कार्य यांच्यातील संबंध आम्हाला समजेल. देवाचे तारण व उध्दार, सुटका यांची सुवार्ता सर्वांनी ऐकावी म्हणून ख्रिस्त आला आणि ख्रिस्त पुन्हा परत येईपर्यंत सुवार्ता वचनाचा प्रसार करणे आणि सतत चालू असलेल्या या वाट पाहाण्यात आमच्यासह राहण्यास आमंत्रण देण्याची जबाबदारी आमच्यावरच आहे.

या आगमन समयात आम्ही ख्रिस्ताचा जन्मोत्सव वेगळ्या प्रकारे करु या. अवतीभवतीच्या गरीब लोकांकडे गरीब लोकांकडे दृष्टीक्षेप टाकू या. अनाथ, विधवा, दुःखी लोकांची विशेष करुन या सोहळ्यात आठवण ठेवू या. आपल्या आनंदात त्यांनाही सामील करुन घेऊ. ख्रिस्त जन्माचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवू या. आमच्या मान-सन्मानांचा , प्रतिष्ठेचा त्याग करुन, आजाऱ्यांची, दुःखितांची सेवा करण्याचे व्रत घेऊया. येशू ख्रिस्ताचे अस्तित्व जर आमच्यात असेल ख्रिस्ताचा जन्म आमच्या अंतःकरणात झालेला असेल तर त्याच्या जन्माच्या प्रकाशाने आमचे अंतःकरण प्रकाशित होऊ द्या. म्हणजे मग आम्ही नक्कीच त्याचे शिष्य होण्यास पात्र ठरु. पुन्हा एकदा नव्याने आम्ही आमच्या जीवनाचे नम्रतापूर्वक ख्रिस्तराजाला समर्पण करु.

**-रेव्ह. ई.एस.रॉबीन,** कल्याण
एक निवृत्त मेथडिस्ट पालक(९८१८९२२४७०४)

# खरा नाताळ

नाताळ म्हणजे प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस. दोन हजार वर्षापूर्वी यशया संदेष्टा या भविष्यवाद्याने येशू ख्रिस्ताच्या जन्माचे भविष्य वर्तविले होते. यशया ७:१४ या वचनामध्ये त्याने म्हटले आहे की पाहा कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचे नांव इम्मानुएल (आम्ह सान्निध्य देव) असे ठेवील. परमेश्वराच्या मानवावरील प्रीतीचे प्रकटीकरण ख्रिस्त जन्माने सिध्द झाले. पुढे अध्याय ९:१४ मध्ये त्याने म्हटले आहे की, कारण आम्हांसाठी बाळ जन्मला आहे. आम्हाला पुत्र दिला आहे. त्याच्या खांद्यावर सत्ता राहील. त्याला अद्‌भूत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती म्हणतील. खरोखर येशू बाळाच्या जन्माचे भविष्य सत्यात उतरले. देवाने जगावर एवढी महान प्रीती केली की त्याने आपला पुत्र स्वतःसाठी राखून न ठेवता पताक्यांच्या पापविमोचन व उध्दारासाठी दिला. (योहान ३:१६). प्रीती देहरुप धारण करुन येशू बाळाच्या जन्माने या भूतलावर अवतरली. यास्तव नाताळ हा प्रीतीचा वर्षाव करण्याचा सण आहे. आपण स्वतःवर जेवढी प्रीती करतो. तेवढीच प्रीती शेजाऱ्यावर कर अशी शिकवण येशूने दिली.

आपला शेजारी कोण ? केवळ आपल्या इमारतीत शेजारी राहणारे शेजारी नव्हे तर उत्तम शोमरोनीने ज्या आपदग्रस्त असहाय अनोळखी जमखी माणसाला सहाय्य केले, तसे जे लाचार, निराधार, गरजवंत, गरीब हे आपले शेजारी मानून ख्रिस्तजयंतीच्या काळात त्यांना सर्वांगिण सहाय्य करण्यात नाताळाचा आनंद, समाधान सामावलेले आहे. येशूने आपल्या शत्रूवर देखील ‘मित्राच्या अपराधाची क्षमा कर’ प्रीतीचा सर्वोत्तम वर्षाव करणारी ही आज्ञा नव्हे काय ? पहिले करिंथ अध्याय १३ वचन १- ७ मध्ये सर्व विद्या, सर्व गुजे, सर्व उत्तम साध्य असले परंतु मनात प्रीती वसत नसली तर आपले व्यक्तीमत्व वाजणारी थाळी व झणझणणारी झांज ठरते. प्रीती निःस्वार्थी असते. गरजवंत निराधाराला मदत करणे म्हणजे खुद्द येशूला सहाय्य करण्यासारखे आहे असे स्वतः येशू ख्रिस्ताने म्हटले आहे. परस्परांतील द्वेषभावना विसरुन अडलेल्या गरजू लाचारांचे, जे अंधारात चाचपडत आहेत. अशांना सहाय्य करुन त्यांना येशूच्या दिव्य प्रकाशात आणून आपली प्रिती नाताळाच्या सणांत प्रसारीत करणे हा नाताळ साजरा करण्याचा उद्देश होय.



नाताळ हा प्रकाशाचा सण आहे. देवपित्याने आपल्याला त्याच्या एकुलत्या एक पुत्राच्या द्वारे आपली सर्वोत्तम देणगी दिली. येशू हा आपल्या देवत्वामुळे अद्‌भूत आहे. त्याच्या जन्माने पृथ्वीवरील अंधःकार नाहीसा होऊन संपूर्ण पृथ्वीवर त्याचे तेज पसरले. जे त्याच्या सान्निध्यात आले त्या सर्वांना येशू हा जगाचा प्रकाश आहे हे समजले. अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला. मृत्यूच्छायेच्या प्रदेशात वसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे. (यशया ९:२) पूर्वी तुम्ही अंधःकार असे होता. पण आता तुम्ही प्रभूमध्ये प्रकाश असे आहात. प्रकाशाच्या प्रजेसारखे चाला. अंधाराच्या निष्फळ कर्माचे भागीदार होऊ नका. (इफिस ५:८ व ११) ऊठ प्रकाशमान हो, कारण प्रकाश तुजकडे आला आहे. परमेश्वराचे तेज तुजवर उदय पावले आहे (यशया ६०:१) पवित्र शास्त्रातील ही वचने येशू प्रकाश आहे हे सिध्द करतात.

आम्ही चालू प्रकाशांत , प्रकाशांत । प्रकाशांत
आम्ही चालू प्रकाशांत त्याच्या प्रकाशात! ....

असे सदाचारी वर्तन करण्याची प्रेरणा देतात. पापांधकाराचा त्याग करुन येशूच्या प्रकाशांत चालणे हा खरा नाताळ नव्हे काय ? नाताळात आपल्या घराच्या ओसरीवर , इमारतीच्या गॅलरीत लटकणारा तेजस्वी तारा आपल्या

घरांत प्रकाशसूर्य येशूबाळ जन्मल्याची ग्वाही देत असतो. आपल्या प्रीतीपूर्ण आचार-विचार आदरातिथ्य व्यवहाराने आपल्या सहवासात येणारे आपले शेजार, मित्र-मैत्रीणी, सहकारी, कुटुंबगण येशूच्या प्रकाशात न्हाऊन निघावे हा खरा नाताळ.

नाताळ हा लीन होण्याचा व नम्रता धारण करण्याचा सण कारण येशू हा 'दीन नरास्तव दीन होऊनही या जगती आला' येशू हा चराचराचा स्वामी आहे. देवाला सर्व काही शक्य आहे. एखाद्या भव्य राजवाड्यात अथवा राजमहालात जन्म घेणे त्याला सहज शक्य होते. परंतु आपली नम्रता प्रकट करण्यासाठी त्याने गाईच्या गोठ्यांतील गव्हाणीची निवड केली. होसान्नाच्या गजरात गाढवीच्या शिंगरावर बसून जयोत्सव साजरा केला. आपल्या शिष्यांचे पाय धुवून नम्रतेचा मूर्तीमंत धडा घालून दिला. आपली ख्रिस्ती मंडळी, शेजारी कार्यालयातील विधर्मी सहकारी, यांना आपल्या नम्रतेचा व लीनपणाचा सुखद अनुभव यावा हा खरा नाताळ.

नाताळ हा अर्पण करण्याचा सण. येशू जन्माची सुवार्ता जाहिर करणारा एक तेजस्वी तारा आकाशांत नव्याने झळकला. पूर्वेकडील मागी मंडळींचा हा तारा वाटाड्या बनला. तेजस्वी ताऱ्याच्या मार्गदर्शनाखाली मागी विद्वानांनी मार्गक्रमण केले. ताऱ्याने त्यांना येशूच्या जन्मस्थळी पोहचविले. मागी लोक येशू बाळाच्या दर्शनाने धन्य झाले. त्यांनी उद, गंधरस व सुवर्ण येशुला अर्पण केले आपण त्याला काय अर्पण करणार ? आपला वेळ, पैसा, श्रम की अंतःकरण आपले तन-मन-धन येशूबाळाला अर्पण करणे आपल्या हिताचे ठरेल. कारण 'भग्न व अनुतप्त हृदय परमेश्वर तुच्छ मानीत नाही. तेव्हा पापांगिकार केलेले, पश्चातापदग्ध अंतःकरण येशूला अर्पण करुन तारण प्राप्तीसाठी हा येशू जन्माचा काळ सर्वार्थाने उचित वाटतो. प्रभू येशूच्या प्रकाशांत जीवितक्रम जगण्याचा निश्चय करणे म्हणजे खरा नाताळ होय.

हा नाताळ व येणारे नविन वर्ष मंडळीतील सर्व लहानथोरांना आशिर्वादाचे अध्यात्मिक लाभाचे व आरोग्यदायी जावो ही प्रभूचरणी नम्र प्रार्थना.

अमीन.

**- मिस निर्मला काळे**

---

## मंडळीस येणारा नाताळ व नवीन वर्ष सुखाचे, समृध्दीचे, भरभराटीचे आणि आनंदाचे जावो !



मंडळीचे पाळक :
**रेव्ह. सॅम्युएल जोगळेकर**

सचिव :
**सॅमसन समुद्रे**

समस्त पास्टरेट कमिटी आणि पास्टरेट कॉन्फरन्स



# प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत

माझ्या मैत्रीणीचा एक नातेवाईक आहे. तो तिच्याकडे मला भेटला व मला म्हणाला धार्मिक पुस्तकांची व लिखाणाची तुम्हाला फार आवड आहे ? मी म्हणाले होय, माझ्याकडे काही लेखकांची पुस्तके आहेत. माझं स्वतःची ही काही लिखाण आहे. मी तुला देवू काय ? त्याला फार आनंद झाला व त्याने ते लिखाण घरी नेले.

जातांना त्याने मला एक वाक्या वापरले ते पवित्र शास्त्रांतील होते की ''प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत' ते (करिंथ याचा १५ :५८) वचन घरी आल्यावर मी वाचले व त्यावर विचार केला कि खरोखर येशूची सुवार्ता सांगण्यासारखी आहे आणि हे श्रम किती जणांनी घेतले. हा एक मोठा गहन प्रश्न आहे. किती जणांनी हे श्रम घेतले ? त्यातील अनेक ख्रिस्ताचे साक्षीदार म्हणून अजरामर आहेत आणि चमत्कार करण्याचे दान ही त्यांना मिळालेले आहे.

कारण येशू एकदा म्हणाला होता. लुक १४:२७ जो कोणी स्वतःचा वधस्तंभ घेवून माझ्या मागे येत नाही. त्याला माझा शिष्य होता येणार नाही. किती कठीण गोष्ट आहे. परंतु ज्यांनी येशूला स्वतःच्या पाचारणासाठी अंतःकरणात घेतले ते त्याच्या पाठीमागे गेले.

पेत्र आणि पौल ह्या दोन अशा व्यक्ती होत्या कि शास्त्रांमध्ये त्याचा उल्लेख आहे व त्याचा उल्लेख वरचेवर आढळतो. कारण ते येशूचे खरे शिष्य होते. हे सत्य आहे. पौलाला तेरावा शिष्य म्हणतात कारण शिष्यानंतर त्यांचा नंबर आहे. कारण येशू त्याच्याशी बोलला. त्याने गमालिएलाकडे शिक्षण घेतले व त्याला स्वतःला अगाध ज्ञान होते आणि आता परमेश्वराचे पाचारण झाल्यानंतर त्याला दैवी ज्ञान प्राप्त झाले होते.

तसेच पेत्र नेहमी प्रभूला प्रश्न विचारीत असे एकदा प्रभूने शिष्यांना विचारले तुम्ही मला कोण म्हणून म्हणता ? पेत्राने उत्तर दिले आपण ख्रिस्त म्हणजे जिवंत देवाचे पुत्र आहा. येशूने म्हटले ''पेत्रा धन्य तुझी ! स्वर्गातील पित्याकडून तुला हे प्राप्त झाले आहे. तू खडक आहेस या खडकावर मी माझी मंडळी रचिन व स्वर्गाच्या किल्ल्या मी तुझ्या जवळ देईन. पेत्र चांगल्या गुणाचा असेल म्हणूनच प्रभूने त्याला एवढे मोठे आश्वासन दिले कारण येशूच्या नजरेत त्याचे चांगले गुण होते व श्रम होते पौलाने पुष्कळ पत्रे लिहिली आहेत. ती आपण आवडीने वाचतो व पाळक सुवार्तिक त्यावर प्रवचने देत असतात त्याने परिवर्तन होण्यापूर्वी ख्रिस्ती लोकांचा पुष्कळ छळ केला. लोक त्याला भित असत. नंतर लोकांनी त्याचा अभ्यास केला. त्यानंतर लोकांना असं वाटले आपण कुठेही नाही.



पण प्रभुने त्याचे रक्षण केले त्याला दैवी शक्ती व सामर्थ्य दिले. (गलती ५: २२) त्याच्या शरीरावर छड्यांचा मार व धोंड मार यांच्या खूणा होत्या. त्याने तुरुंगात अनेक वेळा मार खाल्ला परंतु त्याने कुरकुर केली नाही तर त्यातच त्याने आनंद मानला. कारण त्या पाठीमागे त्याचे श्रम होते. (दुसरे करिंथ ११ :२१ -२३) कैद सोसण्यास मी अधिक आहे. ५ वेळा ३९ फटके ३ वेळा छड्यांचा मार तीन वेळा गलबत फुटले एक दिवस व एक रात्र समुद्रांत घालविली. लुटारुमुळे लाभलेली संकटे कष्ट श्रम व जागरणे उपास सर्व प्रेषितांपेक्षा तो श्रेष्ठ होता. त्याच्या पत्रातील गोष्टी आपल्या समजण्या पलीकडच्या असतात. त्याने बऱ्याच आजारी लोकांना बरे केले. म्हणून तो म्हणतो प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत म्हणून तुम्ही स्थीर व अढळ व्हा व प्रभुच्या सेवेत तत्पर रहा येशू ख्रिस्ताने तो सेवेत होता तेव्हा आणि तत्पूर्वीहि त्याने पुष्कळ श्रम घेतले.

येशू जगांत होता. तेव्हा कोणत्याही प्रकारचे वाहन त्याच्याजवळ नव्हते. येशू पायी प्रवास करीत असें देवाची सुवार्ता सांगत असतांना हजारो लोक त्याच्या पाठीमागे असत. येशूचे स्वतःचे घर नव्हते एवढेच काय परंतु कबर सुध्दा

त्याची नव्हती. चर्चचा सभासद असणं ही एक जबाबदारी आहे. आजारी माणसाला भेटी देणे. काही स्त्रिया आहेत काही पुरुष आहेत ते सदैव चर्चच्या सेवेत आहेत आणि खरोखर पौल म्हणतो तसे.

प्रभुमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत. आजचे लिखाण म्हणजे आमच्या चर्चला या वर्षी १०० वर्षे पूर्ण होतात. खरोखर प्रत्येक सभासदाला मनापासून आनंद व समाधान होत आहे. कारण ही गोष्ट साधारण नाही आणि ख्रिस्ताला स्विकारणं ख्रिस्ताबरोबर चालणं तेही सोपं नाही परंतु प्रभू आपलं सहाय्य करतो, कारण ते त्याचं मंदिर आहे.

ज्या ख्रिस्ती व्यक्ती या खडतर जिवनातून गेल्या असतील, त्यांना आम्ही अभिवादन करतो व कौतूक करतो. कारण हे सर्व कठीण आहे लोक पहिल्यापासून ख्रिश्चन म्हटले तर त्याकडे तुच्छतेने बघणार व मनाला पाहिजे ते शब्द वापरणार. विशेष म्हणजे पाळक वर्गाला यामध्ये फार त्रास झाला खेड्यातील पाळकाला कोणतीही गरज असली तरी त्याला ती मिळणार नाही.

परंतु अनेक सेवकांनी हा त्रास काढला काही सुवार्तीक रात्री न जेवताच झोपी जात, कारण प्रत्येक चर्च सहज सोप्या रितीने बांधले गेले नाही त्यासाठी ख्रिस्ती सेवकांना अतोनात श्रम करावे लागले. मला हि खेड्यातील एक अनुभव आहे मी ७ वी त होते. मला पप्पाने शाळेत टाकले तीन चार दिवस झाले मला बसायला बेंच मिळाला नाही. मला जमिनीवर बसायला सांगायचे सर्व मुली बेंचवर मी खाली, मी घरी येवून पप्पाला ही गोष्ट सांगितली आमचे पप्पा फार समजूतदार होते, ते म्हणाले बेंच शिल्लक नसेल, बस थोड्या दिवस खाली. परंतु मला बेंच कोणी दिला नाही. त्या वयात सुध्दा मला ते अपमानास्पद वाटायचे. त्याचे कारण मी समजू शकले नाही. एकदा पप्पा माझ्या बरोबर आले व म्हणाले बाई एखादा बेंच हिच्यासाठी बघा, तिला बेंच मिळेपर्यंत मी येथून हालणार नाही, मग मात्र मला बेंच मिळाला तिचे आभार मानले फार दिवसांनी मला त्याचा उलगडा झाला, असे ते दिवस होते.

जगामध्ये ख्रिस्ती लोकांच्या विरोधांत किती छोट्या मोठ्या गोष्टी होवून गेल्या त्यात किती लोकांचा सहभाग आहे तसे म्हटल तर साधू सुंदर सिंगला सुध्दा किती त्रास झाला असे कितीसुवार्तीक पाळक होवून गेले, त्याच्यावर पुस्तके लिहिली आहेत ते आपण वाचतो.

चर्चला नियमित येणे कारण आपण त्याचे सभासद आहोत. सभासदाच्या घरी भेटी देवून त्याचं सुख दुख विचारणे व देवाजवळ प्रार्थना करणे वृध्द लोकांची मदत करणे कारण देवाने आपणांस निवडले आहे.

आणि म्हणून पौल म्हणतो प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत.

आमच्या चर्चला प्रभू आणखी आयुष्य देवून त्याची वाढ करो ही प्रभूजवळ प्रार्थना आहे.

**- श्रीमती वासंतिका डी. कदम**

## जानेवारी - फेब्रुवारी महिन्यातील महत्त्वाचे दिवस आणि रविवार

### जानेवारी :

१ - नववर्ष - एपिफनी रविवार
८ - येशूचा बाप्तिस्मा
९ - एन.आर.आय. दिवस
१२ - राष्ट्रिय युवा दिवस
१५ - एपिफनी नंतरचा दुसरा रविवार, सेना दिवस
२२ - एपिफनी नंतरचा तिसरा रविवार
२६ - गणतंत्र दिवस - देशभक्तीपर समुहगान स्पर्धा
२९ - एपिफनी नंतरचा चौथा रविवार
३० - हुतात्मा दिवस, विश्व कुष्ठ निर्मुलन दिवस

### फेब्रुवारी :

५ - एपिफनी नंतरचा पाचवा रविवार
१२ - एपिफनीनंतरचा सहावा रविवार
१९ - एपिफनीनंतरचा सातवा रविवार
२६ - येशूचे रुपांतर रविवार
२८ - राष्ट्रीय विज्ञान दिवस

# नाताळ येतोय!



दरवर्षी नाताळ येतोय,
स्मृती द्यायला,
त्या दिव्य ऐतिहासिक व निर्णायक घटनेची
येशू बाळाच्या जन्माची,
त्याने कालगणना दुभागली,
ख्रिस्त जन्मापासूनचा काळ,
ख्रिस्त जन्मपूर्व काळ,
सर्व काळ, सर्व युगे, सर्व दिवस, त्याचेच आहेत,
त्याचेच राज्य, अधिकार व गौरव.
त्याचाच प्रभाव सर्व प्राणिमात्रांवर व विश्वंभर,
ख्रिसमस - येशुबाळाचे स्वागत करण्याचा दिवस,
प्रत्येक बाळाचा स्वीकार करण्याचा स्मरण दिन
''जो कोणी ह्या बालकाचा माझ्या नावाने स्वीकार करतो
तो माझा स्वीकार करतो आणि जो माझा स्वीकार करतो
तो ज्याने मला पाठवले त्याचा स्वीकार करतो.
तोच श्रेष्ठ आहे.'' - (लूक - ९ : ४८)
मेंढपाळांनी स्वागत केले येशूबाळाचे.
ते निघाले गाणी गात, शुभवार्ता सांगत.
पूर्वेकडील मागी लोक प्रदीर्घ शोधानंतर
बेथलेहेमात आले... गव्हाणीत निजलेल्या येशूबाळाच्या
चरणाशी ते नतमस्तक झाले.
प्रभू दर्शनाचा प्रसाद घेऊन ते परतले सुवार्ता घोषवत
धन्य ती मरिया माता, जिने आपल्या गर्भाशयात
येशूबाळ वाढवले...
धन्य तीच्या उदराचे फळ -येशू
येशूबाळावर मृत्यूची छाया गर्भधारणेपासूनच पडली होती.
मरिया मातेवर मृत्यूचा प्रसंग ओढवणार होता.
पण टळला.
बाळाच्या जन्माची खबर मिळताच
संतप्त हेरोदाचे निघाले फर्मान...
बेथलेहेम व परिसरातील दोन वर्षापर्यंतच्या बाळाची झाली कत्तल.
''रामा येथे रडणे व मोठा आकांत
राहेल आपल्या मुलाकरीता रडत आहे.
ती नाहीत म्हणून ती सांत्वन पावेना'' - (मत्तय २ : १८)
मात्र येशूला वाचवले मायबापाने इंजिप्तला नेऊन.
पुढे अनेकवार येशूवर मरणप्राय हल्ले झाले.
पण तो बचावला कारण त्याची वेळ आली नव्हती,
त्याची घटीका आली तेव्हा तो मृत्युला सामोरा गेला.

वीर मरतो एकवार
भित्रे मरतात वारंवार,
बाईचं गर्भाशय भगवंताने
बालकांना जन्म देण्यासाठी योजिले
आहे.
मात्र त्या देव्हाऱ्यावर हल्ले होत आहेत.
बालकांवर मृत्युची धारदार तलवार तळपत आहे
पवित्र कूस निकामी केली जात आहे.
जननी जीवनवर्धिनी!
तिची काय दशा आहे? मुलगी नको म्हणून भृणहत्या !
विकलांग म्हणून गर्भपात!
अर्भक नको म्हणून जन्मलेले निर्दोष बाळ
कचऱ्याच्या पेटीत ...
माता राहेल नव्हे तर
निर्दोष बाळ हंबरडा फोडतं आहे.
गर्भाशयात बाळ अस्वस्थ आहे.
मातावरच बाळाचा भरवसा उरला नाही.
जे जीवनसंवर्धन करत नाहीत.
बाळावर सुसंस्कार करत नाहीत.
त्यांना जन्मोत्सव साजरा करण्याचा
काय अधिकार आहे?
संत मदर तेरेसा म्हणाली बाळांना मारु नका.
मला द्या. मी वाढीवन.
मुलं नसलेल्यांना द्या.
त्यांना वात्सल्य मिळेल, परिवार फुलेल...
देवाच जगावर प्रेम आहे. म्हणून,
देव जगात बाळ पाठवतो,
त्यावरुन प्रमाणित होत
जो बाळाच स्वागत करतो.
त्याला कुशीत घेतो, खेळवतो, अंगाई गातो, रिझवतो, शिकवतो,
संस्कारीत करतो.
तो रोजच्या जीवनांत नाताळ साजरा करतो.
या ख्रिसमसला आपण बाळाचं स्वागत करु या.
बाळ येशूला आपल्या घरात
काळजाच्या गोशाळेत स्वीकारु या.
आपलं जीवन फुलवूया.

**- रेव्ह. ई. एस.रॉबीन**
एक निवृत्त मेथडिस्ट पाळक (९८१८९२२४७०४)

# देवाने आपल्या लोकांची भेट घेतली

आम्हांमध्ये मोठा संदेष्टा उदयास आला आहे आणि देवाने आपल्या लोकांची भेट घेतली आहे.

प्रभू येशू ख्रिस्त ह्या जगात आल्यापासून गेली दोन हजार वर्षे प्रचंड उलाढाल ह्या जगात झाली. कितीतरी शोध लावण्यात आले. कितीतरी नवीन गोष्टी सुरु करण्यात आल्या. मानवी जीवन ऐश आरामचं करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले परंतु एवढ्या अथक प्रयत्नानंतरही मेलेल्या माणसाला जिवंत करणं ही गोष्ट माणसाला शक्य झाली नाही. देवाने अनेक चमत्कार केले. मात्र दोन हजार वर्षापूर्वी ही गोष्ट येशूने अनेक वेळा करुन दाखवली. कारण तो सामान्य माणूस नव्हता तर सर्वसमर्थ देवाचा पुत्र होता. तो मानव धारण करुन ह्या जगात आला होता. जग त्याला नीट ओळखू शकले नाही. कारण तो आकाशातून एकदम खाली पृथ्वीवर उतरला नाही तर त्याने बालकाच्या रुपात जन्म घेतला. ज्यांच्याकडे देवाचा आत्मा होता तितकेच त्या बाळाला ओळखू शकले पुढे ते बालक वाढत गेल्यानंतर त्याच ज्ञान व सामर्थ्य पाहून मग लोकांना समजलं की तो कोण आहे ?

देवाने ह्या त्याच्या पुत्राद्वारे त्याने घडवलेल्या माणसांची भेट घेतली. संपुर्ण मानवजात आपल्या प्रेमळ व दयाळू निर्माण कर्त्यापासून बहकली व दृष्ट सैतानाच्या तावडीत सापडली त्यामुळे मानवी जीवन, आजार, दु:ख, क्लेश, संकट साडेसाती, पनवती, अश्रू, अपयश अशांनी भरुन गेले. परंतु प्रेमळ देवाला माणसाची दया आली. त्याने आपल्या पुत्राला मानवी रुपात ह्या जगात पाठवलं. अशांसाठी की त्याने देवपित्याचे प्रेम माणसाला कळावे. देवाने आपले प्रेम दाखवण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. तरी माणसाला देवाचे प्रेस समजले नाही. माणूस देवापासून बहकला परंतु देवाने दररोज सुर्यप्रकाश देण्याचे बंद केले नाही, पाऊस देण्याचे थांबवले नाही की पृथ्वीवरील हवा काढून घेतली नाही. तर देवाचे हे प्रेम माणसाला न समजल्याने अखेर त्याने स्वत:चा पुत्रच ह्या जगात पाठवला. ह्यासाठी की त्याने मानवजातीला निक्षून सांगाव की देवाने तुम्हाला सोडलेलं नाही. तो तुमच्यावर प्रेम करतो. प्रभू येशूने तर माणसाला सर्व समर्थ देवाची ओळख तुमचा स्वर्गीय पिता ह्या नात्याने करुन दिली.

खरोखर देवाने माणसाची भेट घेतली आहे. देवाने त्याचे प्रेम दाखवले आहे. आजाऱ्यांना बरे करुन, पाप्यांना क्षमा करुन, मेलेल्यांना उठवून, रडणाऱ्यांचे अश्रु पुसून प्रभू येशूने देवाचे प्रेम सिध्द केले आहे.



आज संपूर्ण जग ओरडतं की देवाने माणसाला सोडले, देव माणसाला विसरलेला आहे. देव ह्या जगात नाही, जगाच्या ह्या आरोपाला देवाने उत्तर दिलेले आहे. देवाने त्याच्या पुत्राद्वारे भेट घेतलेली आहे. निर्माणकर्ता आपल्यावर प्रेम करतो आणि हे प्रेम दोन हजार वर्षापूर्वी त्याने सिध्द केले आहे.

म्हणूनच जेव्हा येशूचा जन्म झाला तेव्हा रानात राखणाऱ्या मेंढपाळांना देवदूत म्हणाला.

भिऊ नका कारण पहा जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांस सांगतो ती ही की तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मास आला आहे. तो ख्रिस्त प्रभू आहे. (लूक २:१०,११)

दोन हजार वर्षापूर्वी प्रभू येशू खिस्त ह्या जगात मानवी रुपात होता आणि आज तो दिसत नाही. ह्याचा अर्थ असा नाही की, आता देवाने माणसाला सोडून दिले आहे. मुळीच नाही, आज प्रभू येशू आत्म्याच्या रुपाने ह्या जगात आहे. तो तुमची भेट घेण्यास तयार आहे. कारण आपल्या स्वर्गीय पित्याने आपल्याला खरं जीवन देण्यासाठी त्याला ह्या जगात पाठवले आहे. जो प्रभू येशूकडे येतो व विश्वास ठेवतो तो पापमुक्त होतो.त्याच्या जीवनातील आजार दु:ख, संकट, क्लेश नाहीशे होतात.

माझ्या प्रिय बंधूभगिनींनो तुम्ही अद्यापी देवविरहीत जीवन जगत आहात का ? देव तुमच्याबरोबर आहे असा अनुभव तुम्हाला येत नाही का ? तुमच जीवन अशांती ने भरुन गेलं आहे का तर मग हा दिवस तुमचं जीवन बदलणारा आणि देवाशी तुमची भेट घालून देणारा दिवस ठरो. तुम्ही कुठही असा प्रभू येशू तिथे तुमची भेट घेण्यास तयार आहे जेव्हा तो तुमची भेट घेईल तेव्हा एका नव्या शांतीचा अनुभव तुम्हाला येईल. आजार, दु:ख, संकट नाहिसे होतील व तुमचं संपूर्ण जीवन नवीन होईल आणि येणारा खरा ख्रिसमसचा आनंद तुमच्या ह्रदयात वास करील व याद्वारे तुमची जीवन उजळून निघतील.

ह्या ख्रिसमसच्या तुम्हाला अंत:करणापासून शुभेच्छा !

**- मिसेस मधुबाला एन जगधने**
(मो.८८५७८०१३१५)

# माझ्या स्वप्नातील शंभराव्या वर्षातील मंदिर

देवाच्या मंदिराला होऊ घातलेली शंभर वर्षे म्हणजेच चर्चचे शतक महोत्सवी वर्ष त्यात ही माझ्या स्वप्नातील शंभराव्या वर्षातील माझे मंदिर किती भन्नाट कल्पना आहे. विषय समजला आणि आठवणींचा काळ एखाद्या चित्रपटासारखा झर-झर समोर उभा राहिला. शंभर वर्ष पूर्ण होणार असलेल्या या परमेश्वराच्या मंदिराला तब्बल ९९ वर्षाचा इतिहास आहे. बराच इतिहास आहे. बऱ्याच चांगल्या वाईट प्रसंगाचे ते साक्षीदार आहे. अनेक कडू-गोड आठवणींचा साठा या भव्य वास्तूजवळ आहे आणि याच मंदिराला शंभर वर्ष पूर्ण होणार आहेत आणि या शंभराव्या वर्षात माझ मंदिर माझ्या दृष्टीकोनातून कस असावं हे सांगण्याची एक संधीच नाही तर सुवर्णसंधीच मला मिळाली आहे.

संडे स्कूल पासून सुरुवात घेऊन आज महिला मंडळापर्यंतचा प्रवास आक्रमत असताना अनेक चांगले वाईट अनुभव मी याच मंदिरात घेतले. छोट्या मोठ्या कारणामुळे होणारे वाद छोटी मोठी भांडण काही वेळा क्षणात मिटली तर काही वाद अगदी विकोपाला गेले. याची साक्ष हे मंदिर निश्‍चित देईल. खुर्चीसाठी चढाओढ करणारे रथी-महारथी पण या वास्तूने पाहिले आहेत. प्रत्येकाला पद आणि खुर्ची ही हवीच. आपली सत्ता गाजवता यावी म्हणून गटबाजी करणारे काही महाभाग देखील या मंदिराला विसरता येणार नाहीत. याबद्दल विचार न केलेलाच बरा. आता शंभर वर्ष पूर्ण होणार असलेलं माझं मंदिर कसं असावं ह्या बद्दल अनेक विचार मनात आले. त्याचबरोबर सर्व विचारांची पूर्तता देखील व्हावी असं अगदी मनापासून वाटतं. मंदिराच प्रवेशद्वार बोगन वेलीनी सुशोभित असं असावं. तर दुरुनच मंदिराच्या शिखरावर विराजमान असलेला क्रॉस दृष्टीस पडावा. जेणेकरुन लांबूनच प्रत्येकाला ह्या मंदिराची ओळख व्हावी. आज जे मंदिरात चाललं आहे ते पाहून कदाचित परमेश्वर देखील हेच म्हणत असावा कि आज मंदिरात होत असलेल्या गोष्टीविषयी मी संतुष्ट नाही. ख्रिस्ती जीवन हे एकाकी मनुष्या सारखं नाही. मंडळीने एकत्र येऊन एकिने कार्य केले तर मंदिरात संजीवन येत आणि मला तेच अपेक्षित आहे.

मंदिरामध्ये आपली साक्ष देण्यासाठी काही लोक फारच उत्सुक असतात. मी मंदिरासाठी अमुक केलं, तमुक केलं खुप कष्ट घेतले. पण मला वाटत अस असु नये. आपल्या अनुभवाचे प्रदर्शन अशा प्रकारे मांडू नये. ह्या बाबतीत मला एक गोष्ट आठवते. एकदा येशू ख्रिस्त मंदिरात गेले. पाहू तरी मंडळीत किती लोक माझ्यासाठी मंदिरात आले आहेत आणि तो एका कोपऱ्यात जाऊन उभा राहिला त्याच्या असं लक्षात आलं काही



लोक पदासाठी तर काही पैशासाठी भांडत होते. तर कुणी एकमेकांचे दोष काढण्यात मग्न होते. देवाच्या उपस्थितीची जाणीव देखील कुणाला नव्हती. देव खिन्न मनाने मंदिरातून बाहेर पडला. शंभर वर्षाकडे वाटचाल करणारं हे मंदिर मात्र परमेश्वर रहित असू नये असं मला मनापासून वाटतं. प्रत्येक सभासदाचा अध्यात्मिक विश्वास हाच आपल्या मंदिरासाठी मोठा आशिर्वाद आहे. मंदिरात येणाऱ्या प्रत्येक कष्टी, भाराक्रांत व्यक्तीच्या प्रार्थनेच उत्तर त्याला मिळावं. प्रत्येक गरजवंताला मदतीचा हात मिळावा आणि या भक्ती मंदिरातून कोणी कधीही रिक्त हस्ते किंवा निराशेने जाऊ नये असे मला वाटते. दुःखी अंतकरणाच्या लोकांसाठी हे मंदिर आशेच स्थान व्हावं. जीवन, आराम, प्रकाश, शुध्दता, सामर्थ्य, शांती आणि अनेक आशिर्वाद आत्म्याच्या समक्षतेत आम्हाला याच मंदिरात मिळावे हीच अपेक्षा आहे. देवाच्या वचनाप्रमाणे (योहान २.१९) त्याच्या अधिकाराचे चिन्ह दाखवण्याकरीता जसे मंदिर तोडण्यास सांगून ते तीन दिवसात परत बांधण्याच आश्वासन दिलं. जे मंदिर बांधण्यासाठी तब्बल शेहचाळीस (४६) वर्षे लागली ते ख्रिस्त फक्त तीन दिवसांत बांधणार होते. आम्हाला तर आमचं मंदिर बांधण्यासाठी ९९ वर्षाचा कालावधी मिळाला. तरी आपण कोठे आहोत हा आपल्या स्वतःचा आत्मचिंतनाचा विषय आहे. खरं पाहता माझं मंदिर कस असावं याबद्दल ना.वा.टिळकांच्या ओळी अगदी सहज माझ्या ओठावर आल्या आणि मी त्या गुणगुणु लागले.

सुंदर देऊळ हृदय हे माझे ।<br>
येथेच विराजे देव बाप।।

**- मिसेस ग्लोरी नितिन रावडे**

# हास्य व बोध

## एक विचार करायला लावणारी गोष्ट

९ वी चा एक विद्यार्थी अचानक एके दिवशी शाळेत जायला नकार देतो. त्याच्या घरातील वडीलधारी लोक, शाळेतील शिक्षक, इतर अनेक लोकं त्याला खूप समजावतात पण तो ऐकत नाही. शेवटी मानसोपचार तज्ञा कडे त्याला नेले जाते. मानसोपचार तज्ञ विविध प्रकारे दोन चार ग्रुहे मध्ये त्याचे कारण जाणून घेतो. त्याचा **गोषवारा:**

**मुलाचे स्पष्टीकरण:** ''माझ्या वाढदिवशी माझ्या मित्रांना मी पार्टी द्यावी अशी माझी मनापासून इच्छा होती म्हणून त्यांना पार्टी द्यायचे कबुल केले. त्या दिवशी पैसे मागायला घरी कोणीच न्हवते म्हणून मी १०० रुपये घरातून उचालले व त्यातले ९० रु पाणीपुरी च्या पार्टी साठी खर्च केले. उरलेले १० रु दुसऱ्या दिवशी मी आईला दिले आणि पार्टी बाबत सांगितले. ''

मला खरच मनापासून मित्रांना पार्टी द्यावीशी वाटली म्हणून मी असे केले आणि त्याबाबत दुसऱ्या दिवशी लगेच घरी सांगितले.

परंतु आई, बाबा व इतर सर्वांना मी १०० रु त्यांना न विचारता घेतले म्हणजे मी चोरी केली व मला वाईट सवय लागली असा त्यांचा ठाम समज झाला. त्यांनी माझ्याकडून कागदावर लिहून घेतले कि मी अशी चूक परत करणार नाही.

शाळेतल्या वर्गशिक्षकांनी सुद्धा इतर मुलांनी असे करू नये व मुलांना शिस्त लागावी म्हणून माझ्यासकट सर्व मुलांना भरपूर उपदेशाचे डोस पाजले व माझ्याकडून परत असे करणार नाही असे कागदावर लिहून घेतले.'

तज्ज्ञाने मुलाला समजावले ''मग यात काय एवढे बिघडले. तुझ्या कडून चूक झाली व तू परत अशी चूक करणार नाही याची फक्त खात्री करून घेण्यासाठी व तुझ्या चांगल्या साठी तर हे केले.''

यावर मुलाने दिलेले उत्तर मात्र खरच विचार करण्यासारखे आहे

''माझ्या आईने ज्या कागदावर मला लिहून द्यायला सांगितला तो कागद माझ्या आईच्या ऑफिस चा होता. गेली अनेक वर्षे मला मिळणारे सगळे कागद, वह्या ती ऑफिस मधूनच आणते. ज्या पेनाने मला लिहायला सांगितले ते पेन वडिलांच्या ऑफिस मधले होते. गेली अनेक वर्षे माझी सगळी स्टेशनरी बाबाच्या ऑफीसचीच असते. आणि माझे आई बाबा त्याबद्दल फार अभिमानाने घरी बोलतात. शाळेतल्या शिक्षकानीं दिलेले कागद आणि पेन सुद्धा त्यांचे स्वत:चे नव्हते तर शाळेचे नाव असलेला कागद व शाळेच्या नावाचे पेन ते वापरत होते. वर्षानुवर्षे शिक्षक व माझे पालक अश्या छुप्या चोरीच्या वस्तू वापरतात आणि मला मात्र एका अनाहूत पणे घडकेल्या चुकीची जाहीर कबुली अश्या चोरीच्या वस्तूवर करायला सांगतात. मी तर प्रामाणिक पणे घडलेला किस्सा घरी लगेच सांगून उरलेले १० रु लगेच परतसुद्धा केले होते. पण या घटनेने घरी, शाळेत जे काही उपदेशाचे डोस पाजले गेले, त्याचा मला इतका उबग आला कि मला आता शाळेत किंवा घरी जावेसे वाटत नाही.''

दोन साधू नदीच्या काठी आपले हात पाय धुवत होते. तेव्हा त्यांना एक विंचू बूडत असताना त्यांना दिसला. त्या साधूंपैकी एकाने लगेच त्याला ओंजळीत घेवून बाहेर काढले. पण त्याच वेळी त्या साधुला विंचुने डंक मारला आणि विंचु परत नदीत पडला.

परंतु साधूने परत त्याला उचलुन घेतले तरी परत त्या ? ?विंचूने साधूला डंक मारला. हे बघुन दुस्र्या साधूने त्या साधूला विचारले तो ? ? विंचू तुम्हाला सारखा डंक मारतो पण तुम्ही परत त्याला वाचवता का ?

त्यावर त्या साधूने अतिशय चांगले उत्तर दिले,'डंक मारने हा त्याचा नैसर्गिक गुण आहे पण त्याला वाचविने हा माझा नैसर्गिक गुण आहे'.

लोक कितीही तुम्हाला त्रास देवो तुमचे चांगले कार्य मात्र सतत चालू ठेवा. काही शुल्लक लोकांसाठी तुमचे विचार कधीही बदलू नका......

**एका पोस्टमनने एका घराचे दार ठोठावले आणि हाक दिली,'पत्र घ्या.'**

आतुन एका लहान मुलीचा आवाज आला, 'येते येते.'

पण तीन -चार मिनीटे झाली तरी आतून कुणीही आले नाही.त्यामुळे पुन्हा एकदा पोस्टमनने आवाज दिला, 'अरे दादा,घरात कुणी असेल तर येऊन चिठ्ठी घ्या.'

पुन्हा एकदा त्याच लहान मुलीचा आवाज आला. 'पोस्टमन काका, दरवाज्या खालुन चिठ्ठी आत टाका, मी येतेच आहे.'

पोस्टमनने रागातच चिडून म्हटले,'नाही.मी ईथे उभा आहे. पत्र रजिस्टर आहे.पावतीवर तुम्हाला सही करायची आहे.'

जवळ जवळ सहा- सात मिनीटांनंतर दरवाजा उघडला.

पोस्टमनला आतापर्यंत उशीर झाल्यामुळे बराच राग आला होता आणि कधी एकदा दरवाजा उघडतो आणि आपण त्या मुलीली ओरडतो असे त्याला झाले होते.पण दरवाजा उघडताच तो आश्चर्यचकित झाला.

कारण त्याच्या समोर एक लहान मुलगी उभी होती, पण तिला दोन्ही पाय नव्हते. ती कुबड्यां च्या आधारे उभी होती.

पोस्टमन गुपचुप पत्र देऊन व तिची सही घेऊन निघुन गेले.

आठवडा -दोन आठवड्यांनी जेव्हा कधी त्या मुलीला पत्र येत असे, पोस्टमन एक आवाज देऊन ती मुलगी येईपर्यंत दरवाजा बाहेर तिची वाट पाहत.

एक दिवस जेव्हा त्या मुलीने पाहीले की, पोस्टमन काका चप्पल न घालताच सगळ्यांची पत्रे वाटतात,

तेव्हा तिला फार वाईट वाटले. नाताळ जवळ आला होता.त्यामुळे पोस्टमनकाकांना नाताळाची भेट काय द्यायची याचा विचार ती मुलगी बऱ्याच दिवसा पासुन करत होती.

एके दिवशी तिने काकां कडून चिठ्ठी घेतली. ते जाताच त्या मातीवरील त्यांच्या पायांचे ठसे एका कागदावर पेनाच्या साहाय्याने काढुन घेतले. दुसऱ्या दिवशी तिच्याकडे काम करण्ग्रया बाईने बाजारातुन तिला त्या मापाच्या चपला आणुन दिल्या.

नाताळ आला आणि पोस्टमन काका गल्लीतील सगळ्यां कडून नाताळाचे बक्षीस मागत होते.त्यांनी विचार केला की, या लहान मुलीकडून आपण काहीही घ्यायचे नाही, पण तिला भेटुन नाताळाच्या शुभेच्छा नक्की देऊन जाऊ या.

त्यांनी त्या मुलीचा दरवाजा ठोठावला

आतुन आवाज आला 'कोण आहे..?'

'पोस्टमन' उत्तर मिळाले.

लगेचच ती मुलगी हातात एक गिफ्ट पँक घेऊन आली आणि तिने पोस्टमन काकांना ते दिले व म्हटले,

'काका नाताळाच्या शुभेच्छा.

आणि हो हे पाकीट घरी जाऊन उघडायचे.

'घरी जाऊन जेव्हा त्यांनी ते पाकीट उघडले,

तेव्हा ते फार भावुक झाले. कारण त्यात त्यांच्या करीता एक जोडी चपला होत्या. ते पाहुन त्यांचे डोळे भरून आले.

पुढच्या दिवशी पोस्टमन ऑफिसमध्ये जाताच त्यांनी पोस्ट मास्तरांना सांगीतले की, मला बदली हवी आहे.

पोस्ट मास्तरांनी कारण विचारले असता त्यांनी भरल्या डोळ्यांनी सर्व सांगीतले.

'आजनंतर मी परत कधी त्या गल्लीत जाणार नाही. कारण त्या मुलीने स्वतःला पाय नसूनही माझ्या पायांची गरज ओळखली,

तिने मला चपला दिल्या, पण मी तिला कधीही तिचे पाय परत मिळवुन देऊ शकत नाही.

'संवेदनशीलता' हीच खरी 'सहीष्णुता' आहे.

कारण दुसऱ्यांचे दुःख समजणे खुप गरजेचे आहे.

अनुभव करणे आणि त्याच्या दुःखात सहभागी होणे खुप गरजेचे आहे. हा एक असा दैवी गुण आहे,ज्याच्याशिवाय माणुस अपुर्ण आहे.

प्रभू येशूला प्रार्थना आहे की, त्याने आपल्याला संवेदनशील, त्याच्यासरखे दयाळू बनवावे.

जेणेकरून आपण दुसऱ्याचे दुःख समजून घेऊ व त्याचे दुःख हलके करण्यास हातभार लावु शकु.

**- पा. मधुकर जगताप**

संग्रहातून

# कॅरल पार्टीचा कार्यक्रम, नाताळ २०१६

**आयोजन :** मंडळीचे आचार्य : **रेव्ह. सॅम्युएल जोगळेकर**
सेक्रेटरी : **मि. सॅमसन समुद्रे**
अध्यक्ष क्वायर कमिटी : **मि. राजन कॅम्बल**
सोशल कमिटी चेअरमन : **मि. अजय चांदेकर**

**संचालक : मि. अभिजीत चांदेकर, मि. शामिर देठे, मि. आकाश रणभिसे, मि.सुधीर सुर्यवंशी.**

| दिनांक | वार | विभाग | नेतृत्व |
|---|---|---|---|
| १६/१२/२०१६ | शुक्रवार | उल्हासनगर ३ व ४<br>अंबरनाथ, बदलापूर | जयंत भारशंकर, शारोन तोरणे |
| १७/१२/२०१६ | शनिवार | मुरबाड, शहाड, टिटवाळा<br>मोहने, धोबीघाट | अनुप अल्हाट, सॅम्युएल पटई<br>विल्सन काळपुंड |
| १८/१२/२०१६ | रविवार | शांतिनगर, वालधुनी,<br>विठ्ठलवाडी, कोळशेवाडी | सुधीर सुर्यवंशी, अनिल काळे<br>अब्राहम अडसुळे, संजय पवार<br>अभिषेक वानखेडे |
| १९/१२/२०१६ | सोमवार | रामबाग जोशीबाग | अभिजीत चांदेकर, विश्वास जगताप<br>शामिर देठे, शितल सैदनकर |
| २०/१२/२०१६ | मंगळवार | अनुपम नगर, बिर्ला कॉलेज<br>खडकपाडा, गोदरेज हिल<br>आधारवाडी गौरीपाडा | इम्यानुएल ऐतवडेकर,<br>डॅनिअल आयमन, सतिश रणदिवे<br>आकाश रणभिसे |
| २१/१२/२०१६ | बुधवार | रामदास वाडी, ठाणगेवाडी<br>म्हसोबा मैदान, चिकनघर | वैभव बोर्डे, सॅमसन, खंडागळे,<br>वेरोनिका मूर |
| २२/१२/२०१६ | गुरुवार | पौर्णिमा सिंडीगेट, कर्णिक रोड | विजय रायबोर्डे, सॅमसन समुद्रे |
| २३/१२/२०१६ | शुक्रवार | दिवा, मुंब्रा, भिवंडी, डोंबिवली<br>लोकग्राम, भानुसागर | नरेन छत्रे, संध्या जोजफ |

**सुचना :-**

- विभागीय पुढाऱ्याला आपल्या विभागातील सर्व कुटुंबीयांच्या घराचे ठिकाण माहित असणे आवश्यक आहे. माहितीगार पुढाऱ्यांनी त्यांच्या विभागातील कॅरल ग्रुपचे मार्गदर्शन करावे.
- कॅरलच्या गायक वादक वृंदाने सायंकाळी ७ वाजता चर्चमध्ये जमावे.
- ज्यांचे पत्ते बदललेले असतील त्यांनी त्वरीत पाळक साहेबांना नविन पत्ता लेखी कळवावे.

**संपर्क :- रेव्ह. सॅम्युएल जोगळेकर ८१०८१४०३८०, राजन कॅम्बल - ९८९२६०३०१३**


# नाताळ व नविन वर्ष कार्यक्रम

| दिनांक | वार | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| २४/१२/२०१६ | शनिवार | रात्री १०.०० वा. | ख्रिस्त जन्म पूर्व संध्या आराधना |
| २५/१२/२०१६ | रविवार | सकाळी ९.३० वा. | ख्रिस्त जन्म दिन आराधना |
| २६/१२/२०१६ | सोमवार | संध्या ७.३० वा. | संन्डेस्कुल ख्रिस्मस् ट्री |
| २७/१२/२०१६ | मंगळवार | संध्या ८.०० वा. | प्रिती भोजन |
| २८/१२/२०१६ | बुधवार | दुपारी २.०० वा. | खेळ शर्यती |
| २९/१२/२०१६ | गुरुवार | संध्या ७.३० वा. | विविध मनोरंजनाचे कार्यक्रम<br>मेथडिस्ट मेन व तरुणसंघ |
| ३०/१२/२०१६ | शुक्रवार | संध्या ७.३० वा. | महिला मंडळाचे कार्यक्रम |
| ३१/१२/२०१६ | शनिवार | रात्री १०.०० वा. | नववर्ष पुर्व संध्या आराधना<br>कँडल लाईट सर्व्हिस (महिला मंडळ) |
| १/१/२०१६ | रविवार | सकाळी ९.३० वा. | नुतन वर्ष आराधना |
| | | संध्या ७.३० वा. | सोशल कमेटी तर्फे विशेष कार्यक्रम |

**सुचना :- नाताळ व नुतन वर्षाच्या उपासनेत, पाकिटांतील विशेष दान घेण्यात येईल.**
**नाताळाचे विशेष दानाचे डबे नाताळाच्या उपासनेत सादर करावेत.**

टिप :- प्रिती भोजन कुपन रु. ५०/- प्रत्येकी

संपर्क :- मि. अजय चांदेकर, सॅमसन समुद्र, प्रविण तोरणे, मि. जॉन मनतोडे



# दीपशिखा शब्दकोडे
## क्र. ५



**मि. सत्यानंद शरद कसाब**
संगमनेर, जि. अ.नगर
मो. : ९८८१०८०१८७

**आडवे शब्द**

१ - येशूची एक संज्ञा तो असा देव आहे (रोम ९)
८ - कनन्याचे मुख्य काम तो लेव्यांचा मुख्य ××× होता दाविदाने हे नेमावयास सांगितले. (१ इति.१५)
९ - यहुदी समाजातील एक गट जसे परुशी (मत्तय ३, १६)
१० - या भूतग्रस्ताला बांधून ठेवण्यासाठी वापरलेल्या लोखंडी कड्या तो या कड्याही तोडून टाकी. (मार्क ५)
१३ - होडी ××वा. (मार्क ६)
१४ - पुरुष (उत्पत्ती १) देवाची प्रतिकृती निर्मिती
१५ - फळ, यश (यशया ५३)
१७ - अग्नि याला भस्म करितो (स्त्रोत्र ८३)
२० - पुनरुत्थानानंतर येशूने प्रेषितांना दर्शन दिले. तेव्हा येशू म्हणाला मला चाचपून पहा. हे भूताला नसते.
२१ - यहुदाजवळ असलेली वस्तू (योहान १२, १३)
२३ - ख्रिस्ताच्या रक्ताने, त्याच्या जीवनाने आपण विशेषकरुन उध्दारले जाणार आहोत (रोम ५)
२५ - अधिक (यिर्मया १६ : १२)
२७ - तृष्णा परमेश्वराने लेही येथे शमशोनासाठी एन हक्कोरे हा झरा खोदला कारण शमशोनाला फार तृष्णा लागली होती. (शास्ते १५)
२८ - परमेश्वराच्या घरात ××लेले असावे (स्तो ९२)
२९ - दुर्कसचे गाव (प्रे.कृ ९)
३१ - योग्य न्याय, सदाचरण, प्रामाणिकपणा (मीखा ७)
३२ - आवड पुत्राला न्यायाची आवड आहे. (इब्रा.१)
३३ - दुर्कसचे नाव (प्रे.कृ.९)

**उभे शब्द**

१ - येशूची एक संज्ञा. तो आपल्या आज्ञेत
२ - दर्बेकरचे नाव ××स (प्रे. कृ.२०)
३ - तोटा हानि (यिर्म. ३८. प्रे. कृ.२७)
४ - भुजंगांचे जालीम हे आहे. (अनु.३२)
५ - वास्तव्य. (स्तो. ६८. १ करिंथ ३)
६ - जुळा. थोमा. (योहान ११, २०, २१)
७ - प्रकाशमान, चमकणारे (मार्क ९) (उलटे)
११ - संत पौल म्हणतो. आम्ही जगाचा गाळ, सर्वांची ×××× असे झालो आहो (१ करिंथ ४)
१२ - इफ्ताहची मुलगी हे वाद्य वाजवीत व नाचत त्याला सामोरी झाली. (शास्ते ११)
१६ - सैतान: यांचा बाप (योहान ८)
१८ - प्रसिध्द नावलौकीक (उत्पत्ती ६ गणना १६)
१९ - प्रणाम (रोम १६) ××म (उलटे)
२० - परमेश्वराची स्तुती असो. चोवीस वडील व चार प्राणी उपडे पडून देवाला नमन करताना हे स्वर्गीय शब्द म्हणाले (प्रकटी १९)
२२ - पेरणी. जो नीतिची पेरणी करीतो त्याचे वेतन खात्रीचे असते (नीति ११) शांततेची पेरणी होत आहे. (जखऱ्या ८)
२४ - दिमिष्कातल्या या शिष्यामुळे शौलाच्या डोळ्यावरुन खपल्या पडल्या व त्याला दिसू लागले. (प्रे.कृ.९)
२६ - स्तुती प्रशंसा (नीती २९, रोम १४, १५)
३० - हे अन्नासाठी आहे. (१ करिंथ ६)

# पाककृती

## भाजणीची चकली

**साहित्य :** १ किलो जाडे तांदूळ, ५०० ग्रॅम चणाडाळ, २०० ग्रॅम उडीद डाळ, २५० ग्रॅम मूग डाळ, ५० ग्रॅम साबुदाणा, ५० ग्रॅम पोहे, २ टी स्पून धणे, २ टी स्पून जिरे, ४ टी स्पून कच्चा ओवा, १५ किंवा २० मेथी दाणे, लाल तिखट, मीठ, तीळ, अंदाजे सर्व पदार्थ आवडीप्रमाणे अंदाजे घ्यावे, तळण्यासाठी तेल

**कृती :** सगळ्या वस्तू वेगवेगळ्या घेऊन मंदाग्नीवर करपू न देता हलक्या होईपर्यंत (ओवा भाजू नये) खमंग भाजल्यावर ओवा टाकून चक्कीवर दळून घेणे.

त्या पिठातील १० वाट्या पीठ मोजून घेणे त्याच वाटीने १ वाटी तेल उकळून मोठ्या परातीत असलेल्या पिठावर ओतावे उलथण्याने एकरुप होईपर्यंत उलथवावे. गार झाल्यानंतर दोन्ही हातांनी पीठ चांगले चोळावे. गुठळ्या राहू देवू नये. एकरुप झाल्यानंतर त्यात मीठ, लाल तिखट, तीळ अंदाजाने आपल्या चवीप्रमाणे घालावे आणि कोमट पाण्याने पीठ, घट्ट मळून घेणे. थोडथोडे पीठ घेऊन त्याचे थोडे मऊ गोळे करुन गोळ्यांना तेलाचा हात लावावा व चकलीच्या यंत्रात टाकून चकल्या काढून तेलात तळाव्या. (पिठाचे गोळे जास्त घट्ट व जास्त मऊ नसावे मध्यम असावे.) चकल्या खुसखुशीत व चवदार लागतात.

## पोह्यांचा चिवडा

**साहित्य :** पातळ पोहे २ किलो, शेंगदाणे पाव किलो, कांदा अर्धा किलो, सुके खोबरे पाव किलो, दाल्या (डाळ) २०० ग्रॅम, काजू १०० ग्रॅम (नसल्यास चालतील), हिरवी मिरची अंदाजे, कढीपत्ता (गोड लिंब) एक लहान जुडी, मीठ चवी प्रमाणे, राई एक टेबल स्पून, साखर एक टी स्पून, तेल फोडणीसाठी, हळद एक टी स्पून.

**कृती :** पोहे स्वच्छ करुन मोठ्या पातेल्यात किंवा कढईत टाकावे व थोडे थोडे तेल टाकू कुरकुरीत भाजावे. शेंगदाणे तळून घ्यावे. सुके खोबरे पातळ काप करुन तळून घ्यावेत काजू तळून घ्यावे. हिरवी मिरची तुकडे करुन तळून घ्यावे. कढीपत्ता धुवून पुसून तळून घेणे. कांदा पातळ कापून, ब्राऊन कलर होईपर्यंत तळावा.

**फोडणी :** तेल गरम झाल्यावर त्यात राई घालणे. राई तडतडल्यानंतर हिंग घालणे, गॅस कमी करुन हळद घालणे सर्व फोडणी चिवड्यावर टाकावी त्यात तळलेला कांदा, हिरवी मिरची, डाळ, शेंगदाणा, काजू, मीठ टाकावे. चांगले हलवावे, हवा बंद डब्यात भरुन ठेवावे.

## शेव

**साहित्य :** बारीक बेसन, तेल, ओवा, मीठ

**कृती :** ओवा भिजवून मिक्सर मधून त्याचा रस काढणे, एक ग्लास ओव्याचा रस व एक ग्लास तेल एकत्र करुन मिक्सर मध्ये मिक्स करुन घेणे. एका मोठ्या भांड्यात ते ओतावे. त्यात मीठ अंदाजे व बेसन रसात मावेल तेवढे घालावे. बेसनाचे गोळे करावे गोळे जास्त घट्ट किंवा जास्त मऊ नसावे. लगेचच साच्यात घालू शेव पाडावी. बारीक व जाड दोन्ही प्रकारची शेव करता येते.

**- कल्पना सनी नायडू**
मो. ९८९२६०३०३४

## शब्दकोडे क्र. ४ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | द | य | प्र | का | श | ■ | गा | र | ठा |
| शी | र | ■ | भू | त | ■ | भ | य | ■ | ऊ |
| र | वा | ना | ■ | डे | रा | ■ | न | र | क |
| ■ | जा | त्या | ची | ■ | स | ह | वा | स | ■ |
| बे | ■ | ने | म | स्त | ■ | वा | द | ■ | सिं |
| त | ट | ■ | ■ | व | ■ | ली | न | ■ | हा |
| ■ | ■ | वै | म | न | स्य | ■ | ■ | रा | स |
| उ | ध्दा | र | क | ■ | ■ | अ | धू | ■ | न |
| त्सु | ■ | भा | ■ | श | ता | धि | प | ती | ■ |
| क | ळ | व | ळा | ■ | ठ | क | ■ | त | ळ |

# दीपशिखाच्या लेखकांस खास सुचना

- परधर्माचे धर्मतत्वज्ञान, श्रध्दा, विधी - संस्कार, सणवार, चालीरिती या विषयांवर, संबंधिताच्या धार्मिक भावना दुखवणारे टिकात्मक लिखाण स्वीकारले जाणार नाही.
- वैयक्तिक अथवा कौटुंबिक सदस्यांची माहिती, जिवनचरित्र विषद करणारे लिखाण स्वीकारले जाणार नाही. जसे, 'माझी आई' 'माझे पप्पा' इत्यादी. मान्यवर आणि मृत व्यक्तीची त्रोटक माहिती हा अपवाद मानावा.
- दीपशिखा हे मंडळीसाठी, मंडळीने चालविलेले मंडळीचे मासिक आहे. ते मंडळीचे मुखपुत्र आहे. संदेश अथवा उपदेशपर लिखाण करण्यापेक्षा कथा, लघुकथा, निबंध, कविता असे ललित साहित्य कृपया प्रसिध्दीसाठी पाठवावे. लेख ख्रिस्ती पार्श्वभूमीवर आधारीत असावा. माझ्याकडून घडलेली सुवार्ता, माझी साक्ष, असे सोपे विषय हाताळावे, वैयक्तिक टिका, दोषारोप लिखाणांत टाळावे, फुलस्केप पेपरच्या ३५ ते ४० ओळी एवढीच शब्दमर्यादा असावी. लिखाण महिन्याच्या १५ तारखेपर्यंत द्यावे.
- आपल्या मंडळीतील व्यक्तिला कला, वैद्यक, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या उच्च शिक्षणात उज्वल यश प्राप्ती झाल्याची घटना, क्रिडा, कला, संगीत क्षेत्रात राज्यस्तरावर गौरव प्राप्त झाल्याची घटना, सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये बहुमानाची पदवी प्राप्त झाली अथवा नोकरी, व्यवसाय, व्यापार, उद्योग क्षेत्रामध्ये उच्चाधिकारांची संधी मिळाल्याची घटना यांची माहिती दीपशिखाला कळवावी म्हणजे संबंधितांचे दीपशिखाद्वारे सत्कार, कौतुक, सन्मान करण्याची संधी मिळेल.
- दीपशिखा अंकात प्रकाशित होणाऱ्या कविता व लेख यांच्या लेखकाच्या मतांशी, मंडळीचे आचार्य व दीपशिखाचे संपादक हे सहमत असतीलच असे नव्हे.
- इतरत्र छापलेले लिखाण किंवा भाषांतरीत लिखाण स्वीकारले जाणार नाही. केवळ मंडळीच्या सभासदानेच स्वतः केलेले लिखाण स्वीकारले जाईल. लिखाण स्वीकारण्याचा आणि नाकारण्याचा पूर्ण हक्क संपादकास आहे.

## विशेष सुचना

- नित्यनियमानुसार महिन्याच्या तिसऱ्या रविवारी, उपासनेनंतर पास्टरेट कमिटची सभा घेण्यात येईल. संबंधित सभासदांनी अगत्यपूर्वक हजर रहावे.
- संडेस्कूलच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी नियमित, वेळेवर शब्बाथ शाळेत पाठवावे. सत्तर टक्के उपस्थिती असणारा विद्यार्थीच केवळ विशेष कार्यक्रमात भाग घेण्यास अथवा सवलती प्राप्त करण्यास पात्र ठरेल.

**जानेवारी - फेब्रुवारी २०१६ मधील वाढदिवस**

''तुझ्या चित्तात माझ्या आज्ञा वागोत कारण त्यापासून वयोवृध्दी व कल्याण ही तुला प्राप्त होतील.''
(निति : ३ : १ - २)

मंडळीतर्फे वाढदिवसाच्या शुभेच्छा!

**जानेवारी - फेब्रुवारी २०१६ मधील वर्धापन दिन**

''तुम्ही उभयता जीवनरुपी कृपादानाने सामाईक वतनदार आहात''
(१ पेत्र ३ : ७)

मंडळीतर्फे सर्व दांपत्यास विवाह वर्धापन दिनाच्या शुभेच्छा!

**जानेवारी - फेब्रुवारी २०१६ मधील स्मृती दिन**

''प्रभुमध्ये मृत्यू पावणारे आतांपासून धन्य आहेत.''
(प्रगट : १४ /१३)

मंडळीतर्फे ख्रिस्तवासी प्रियजनांस श्रध्दांजली!